# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १३ जुलै, २०१५ / आषाढ २२, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१) महसूल, पूनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | | |
| **(२) परिवहन मंत्री** | } | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७६**

---

### नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यात इनाम वतन व शर्तीच्या जमिनींबाबत अधिकार नसताना तहसीलदार यांनी जमिनींच्या खरेदी-विक्रीला अनुमती दिल्याबाबत

**(१) * २५१८९ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यात इनाम वतन व शर्तीच्या जमिनींबाबत अधिकार नसतानाही तहसीलदारांनी स्वतःच्या अधिकारात सुमारे ५०० एकर जमीन खरेदी-विक्रीची अनुमती खाजगी व्यक्ती व बांधकाम व्यावसायिकांना दिल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसीलदार यांनी विभागीय आयुक्तांच्या अधिकारात हस्तक्षेप करुन शासनाचे सुमारे सव्वातीन कोटी रुपयांचे नुकसान केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार तहसीलदार व इतर दोषी असणाऱ्या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) प्रश्नाधित प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांनी केलेल्या चौकशीत तहसिलदार नांदगाव यांनी अधिकारबाह्यरित्या काही प्रकरणात नवीन शर्तीच्या भोगवटादार वर्ग-२ च्या शेतजमीनींच्या खरेदी-विक्रीस परवानगी दिल्याचे निदर्शनास आले आहे. चौकशीतील निष्कर्षाच्या आधारे अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांनी संबंधित जमीनी सरकार जमा करण्याबाबत आदेश पारित केले आहेत. तसेच या प्रकरणाशी संबंधीत श्री.सुदाम महाजन, तत्कालीन तहसिलदार, नांदगांव जि.नाशिक, सध्या नियुक्ती तहसिलदार, सुरगाणा, जि.नाशिक यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ४(१)(अ) नुसार, शासन आदेश दि.०७/०७/२०१५ अन्वये निलंबित करण्यात आले असून, त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे. या प्रकरणाशी संबंधित अन्य अधिकारी/कर्मचारी यांची देखिल जबाबदारी निश्चित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयामध्ये बियाणे व पिक वाढ संजीवके यांची होत असलेली विना परवाना विक्री

**(२) * २१४०८ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयामध्ये विना परवाना बियाणे व पिक वाढ संजीवके विक्रीला आल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विना परवाना बियाणे विक्रीकडे शासनाचे अधिकारी दुर्लक्ष करतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) चौकशीअंती विना परवाना बियाणे विक्री करणाऱ्यांवर व तपासणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**काळसे (ता. मालवण, जि.सिंधुदूर्ग), मौजे दादर (ता.पेण, जि.रायगड) व डहाणू (जि.पालघर) तालुक्यात बेकायदा रेती उत्खनन होत असल्याबाबत**

**(३) * १७८६६ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळसे (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील कर्ली खाडीपात्रात बेसुमार रेती उपसा केला जात असून परिसरातील जमिनी खचत असल्याप्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक १४ एप्रिल, २०१५ रोजी तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे दादर (ता.पेण, जि.रायगड) येथील खाडीमध्ये गावक-यांनी २ बाज ३४० ब्रास चोरटी वाळू वाहून नेत असताना दिनांक २३ मे २०१५ रोजी पकडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात बहुतांश भागातील शेतांमध्ये बेकायदा रेती उत्खनन करण्यासाठी ४० ते ५० फुटांचे खड्डे करण्यात आले असून त्याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष झाले असल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) डहाणु तालुक्यातील (जि.पालघर) समुद्रकिनारी गावांमध्ये वाळूचा बेसुमार उपसा, उभारण्यात येणारे विविध प्रकल्प, अनधिकृत बांधकामे यामुळे समुद्रकिनाऱ्यांची मोठया प्रमाणात धूप होऊन गावातील घरांमध्ये पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे असे दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांचेकडे यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) पालघर जिल्हयातील डहाणू तालुक्यात अशी बाब निदर्शनास आली नाही. तथापि गौण खनिजाच्या अवैध वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पतीस आली आहेत.
(५) व (६) (अ) वर्ष २०१४-१५ मध्ये मौजे काळसे (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील वाळूच्या अनधिकृत उत्खनन व वाहतूकीच्या २२ प्रकरणात रु.५,२४,३००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच खाडीपात्रात अवैध उत्खननासाठी वापरण्यात येणारे रॅम्प तोडण्यात आले असून, अनधिकृत उत्खनन करणाऱ्या कामगारांच्या तात्पुरत्या झोपड्याही तोडण्यात आल्या आहेत.
(ब) मौजे दादर (ता.पेण, जि.रायगड) येथील बार्जमधून वाळूची अनधिकृत वाहतूक करण्याच्या प्रकरणात १० इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येवून ३४० ब्रास वाळू व २ बार्ज जप्त करण्यात आले आहेत.
(क) सन २०१४-१५ मध्ये डहाणू तालुक्यात (जि.पालघर) अवैध वाहतुकीच्या ५३ वाहनांवर रु.८,९०,२००/- एवढी दंडनीय कारवाई करण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राहुरी कृषी विद्यापीठाची अतिरिक्त जमिन शेतकऱ्यांना परत करण्याबाबत**

**(४) * २२३९६ श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पहिले कृषी विद्यापीठ म्हणून १९६८ साली राहुरी (जि.अहमदनगर) तालुक्यातील शेतकऱ्यांनी संशोधन कार्यासाठी व इतर कामासाठी सहा गावातील साडेआठ हजार एकर जमिन दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर जिल्हयातील राहूरी कृषी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र घटले असून या कृषी विद्यापीठाचे विभाजन होणार असल्याने राहूरी कृषी विद्यापीठातून ४ हजार एकर अतिरिक्त जमिन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना परत करावी अशी मागणी ग्रामस्थांनी शासनाकडे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राहूरी कृषी विद्यापीठातून ४ हजार एकर अतिरिक्त जमिन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना परत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) महात्मा फुले कृषी विद्यापीठासाठी, सन १९६८ साली राहुरी (जि.अहमदनगर) तालुक्यातील सहा गावातील शेतकऱ्यांची ३९५२.४५ हेक्टर इतकी जमिन संशोधन कार्यासाठी व इतर कामांसाठी संपादित केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या रकमेचा वापर इतरत्र खाजगी खात्यात केल्याचा तसेच यात अनेक गैरप्रकार असल्याचा ठपका नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी ठेवल्याबाबत**

**(५) * १७३०० श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या रकमेचा वापर इतरत्र खाजगी खात्यात केल्याचा तसेच यात अनेक गैरप्रकार असल्याचा ठपका नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी ठेवला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालानुसार वरील योजनेत अनेक वेळा मंजूर रकमेपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात आली असून राज्यांनी निधीचा गैरवापर केला असतांनाही युटीलायझेशन प्रमाणपत्र जारी केले तसेच राज्यांनी अनुदानाअंतर्गत मिळालेली रक्कम एकतर खर्च केली नाही किंवा काही रक्कम खर्च केली मात्र युटिलायझेशन प्रमाणपत्र पूर्ण प्राप्त रक्कमासाठी जारी केले या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) चौकशीअंती शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) महाराष्ट्रात राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या रकमेचा वापर इतरत्र खाजगी खात्यात केल्याचा तसेच यात अनेक गैरप्रकार असल्याचा ठपका नियंत्रक व महालेखा परीक्षक यांनी केला नाही तथापि, त्यांनी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये कार्यपध्दतीत राहिलेल्या उणीवा निदर्शनास आणलेल्या आहेत. त्याचप्रमाणे, योजनेत मंजूर रकमेपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात आलेली नाही वा रकमेचा गैरवापर देखिल झालेला नाही. काही विभागांनी हाती घेतलेल्या प्रकल्पांचा निधी बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे/अंमलबजावणी यंत्रणेकडे वर्ग केला होता व त्या आधारे संबंधित विभागांनी तदर्थ उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले आहे नियंत्रक व महालेखा परीक्षकांच्या अहवालावर राज्य शासनाचा अनुपालन अहवाल केंद्र शासनास सादर करावयाचा असल्याने सद्यस्थितीत, चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विजेच्या दरात वाढ करण्याचे संकेत महावितरण कडून देण्यात आल्याबाबत

**(६) * १९५४० श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक वीज ग्राहकांवरील वीज दराचा भार कमी करण्यासाठी महावितरणने महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे सरासरी ८ टक्के दरवाढीचा ४ हजार ७१७ कोटी रुपयांचा प्रस्ताव माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावामुळे महसुलामध्ये होणारी तूट भरुन काढण्यासाठी दरवाढीचा भार सामान्य वीज ग्राहकांवर टाकलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणने दाखल केलेला प्रस्ताव महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने मंजूर केल्यावर राज्यातील कोटयवधी सामान्य वीज ग्राहकांना, रुग्णालय, शिक्षण संस्था, उद्योजक व व्यापारी वर्गांना आर्थिक बोजा सहन करावा लागणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सामान्य वीज ग्राहकांवरील वीज दराचा भार कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) अंशत: खरे आहे. १०० युनिट पर्यंत घरगुती ग्राहकांसाठी वीजदरात कुठलीही दरवाढ प्रस्तावित केलेली नाही.

(४) महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने पूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन दिनांक २६ जून २०१५ रोजी महावितरणने प्रस्तावित केलेल्या याचिकेवर आदेश पारीत केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

### अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यांमुळ नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पूर्ण नुकसान भरपाई देण्याबाबत

**(७) * १६५९६ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.अजित पवार**

**(बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध भागांमध्ये माहे मार्च, २०१५ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वारे यामुळे किमान २ लाख ६३ हजार ६७७ हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले असून अहमदनगर, नाशिक या जिल्ह्याचे जास्त नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारनेर तालुक्यात दोघांचा मृत्यू होऊन सुमारे १५० घरांची पडझड, आंबा, कांदा, डाळींब, गहू इत्यादी पिकांचे नुकसान झाल्याचे तसेच कोल्हापूर जिल्ह्यात अनेक घरांची पडझड, वेलवर्गीय पिकांचे नुकसान होऊन दोन महिन्यात ५४ लाख २४ हजार रुपयांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यातील राहूरी तालुक्यात १३३० शेतकऱ्यांचे ७८४ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल-मे, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, श्रीगोंदा तालुक्यात सन २०१२-१३ या रब्बी हंगामात निसर्गाच्या प्रकोपामुळे सुमारे ९९ हजार ८१८ शेतकऱ्यांचे नुकसान होऊन यासाठी शासनाने ४६ कोटी ८८ हजार रुपये अनुदान मंजूर केले होते, त्यापैकी ३६ कोटी रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले त्यापैकी १५ हजार शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, गावस्तरावर पंचनामे करुन बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) पारनेर तालुक्यात दोन व्यक्तींचा मृत्यू झाला असून ४ घरांची अंशत: पडझड झाली आहे. आंबा, कांदा, डाळिंब व गहू इत्यादी पिकांचे नुकसान झाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वारे यामुळे एकूण ५८ घरांचे अंशत: नुकसान झाले आहे. मात्र वेलवर्गीय पिकांचे नुकसान झालेले नाही.

(३) अहमदनगर जिल्ह्यातील राहूरी तालुक्यात प्राथमिक अंदाजानुसार १३३० शेतकऱ्यांचे ७४८.६० हेक्टर क्षेत्रावर पिकांचे नुकसान झाले आहे.

(४) श्रीगोंदा तालुक्यात सन २०१२-१३ च्या रब्बी हंगामात झालेल्या पिकांच्या नुकसानीमुळे ९८ हजार ३४४ शेतकऱ्यांना रुपये ४२ कोटी ४६ लक्ष ५५ हजार ६१५ प्रमाणे अनुदानाची आवश्यकता होती. त्यापैकी ७५,७६८ आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रुपये ३४ कोटी ३९ लक्ष ०४ हजार ७०५ इतकी मदत जमा करण्यात आली असून उर्वरित अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) नैसर्गिक आपत्ती अंतर्गत शेतीपिकाचे नुकसान झाल्यास तसेच जीवीत व वित्तहानी झाल्यास त्याबाबतचे पंचनामे करुन मदत देण्याबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करुन आर्थिक मदत देण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मे.आलाना सन्स कंपनीने मौजे खोपटे (ता.उरण, जि.रायगड)**
**येथील शेतक-यांची केलेली फसवणूक**

**(८) * १९८१८ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००५ ते २००६ या कालावधीत खोपटे (ता.उरण, जि.रायगड) येथील शेतक-यांच्या जमिनी मे.आलाना सन्स कंपनीने खोटी खरेदी खते करुन बळकाविल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) चौकशी नुसार सदर कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्राप्त अहवाल व अभिलेखाची तपासणी केली असता अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) तथापि, विचाराधीन प्रश्नाच्या अनुषंगाने प्रकरणाची चौकशी केली असता मे.अलाना सन्स कंपनी यांचे सन २००५ ते २००६ या कालावधीत १४ दस्त नोंदणीकृत झाले असून ते नोंदणी अधिनियम १९०८ मधील तरतुदी नुसार करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात ६०१ शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून केलेल्या आत्महत्या**

**(९) * १६७३६ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.रमेश बुंदिले (दर्यापूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी ते एप्रिल, २०१५ या कालावधीत ६०१ शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागात सन २००१ ते १४ मे, २०१५ पर्यंत १० हजार १३१ कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून यामध्ये सर्वाधिक १ हजार १२२ आत्महत्या या ३० ते ४० वयोगटातील तरूण शेतकऱ्यांनी केली असल्याची धक्कादायक बाब माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये शेतकरी आत्महत्येचे प्रमाण सर्वाधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शेतकऱ्यांना समुपदेशन करण्याबाबत, जास्त आत्महत्या करणाऱ्या जिल्ह्यांमध्ये विशेष पॅकेज देऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) अमरावती विभागात सन २००१ ते माहे मे, २०१५ या कालावधीत १०,२१२ शेतकरी आत्महत्या प्रकरणे निदर्शनास आली आहेत. शेतकरी आत्महत्या प्रकरणांची माहिती वयोगटानुसार अथवा जातीनुसार संकलित करण्यात आलेली नाही.
(४) राज्यातील शेतकरी आत्महत्या संदर्भात ठोस उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांबाबतची सविस्तर माहिती संकलित करण्यासाठी विदर्भातील यवतमाळ व मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यांची पथदर्शी प्रकल्प म्हणुन निवड करण्यात आली आहे. तद्नुषंगाने आत्महत्याग्रस्त व आत्महत्याप्रवण क्षेत्रास विशेष मदत व सहाय्य करण्यासाठी सदर दोन जिल्ह्यातील प्रत्येक उप विभागाकरिता सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आली आहे. या संदर्भात शेतकऱ्यांच्या सर्वेक्षणाचे व माहिती संकलित करण्याचे काम सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दारुबंदीच्या निर्णयानंतर चंद्रपूर जिल्ह्यात परराज्यातून मोठ्या प्रमाणावर दारुची तस्करी होत असल्याबाबत**

**(१०) * २३७५७ श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सीमावर्ती भागात दारुबंदीच्या अंमलबावणीसाठी १४ चेकपोस्ट, २५ कि.मी.चा बफर झोन व दारुबंदी विभागाची ४० पथके तैनात करुनही या जिल्ह्यात छत्तीसगड, आंध्रप्रदेश, तेलंगणा व मध्यप्रदेशातून दारुची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदीसाठी कठोर नियम करुन दारुबंदी लागू करावी असे निर्देश संबंधित जिल्हाधिका-यांनी संबंधित अधिका-यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यात चोरटया दारुची तस्करी रोखण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

**नांदेड जिल्ह्यात वादळीवा-यासह गारपीट व अवकाळी पाऊस झाल्याने शेतक-यांचे शिल्लक असलेली पिकेही उध्दवस्त झाल्याबाबत**

**(११) * १७०९५ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुभाष साबने (देगलूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात सर्वच जिल्ह्यात विशेषत: जालना, हिंगोली, बीड, उस्मानाबाद व वाशिम जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, वीज कोसळून पाच जण ठार होऊन अनेक जण जखमी झाले हे खरे आहे काय,

(२) तसेच हिमायतनगर परिसरामध्ये (ता.जि.नांदेड) माहे मार्च-एप्रिल-मे, २०१५ च्या दरम्यान वादळीवा-यासह गारपीट व अवकाळी पाऊस झाल्याने रब्बी पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या प्रकरणी नुकसानीचे सर्वेक्षण अद्याप झाले नसल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, ही हे खरे आहे काय,

(३) तसेच हिंगोली जिल्ह्यात एप्रिल महिन्यात वादळी पाऊस पडल्याने रब्बी पिकांसह संत्री मोसंबी, केळी, पपई टरबूज व चिकूच्या फळबागा उध्वस्त झाल्या तसेच शेतक-यांच्या घरांची पडझड झाली हे खरे आहे काय,

(४) परभणी जिल्ह्यात परभणी, झरी, गंगाखेड, पालम, सोनपेठ या तालुक्यांमध्ये दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे मोठया प्रमाणात रब्बी पिकांचे, तसेच फळबागांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पहाणी केली आहे काय,

(६) असल्यास, सदर पाहणी अहवालानुसार शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

माहे फेब्रुवारी ते मे, २०१५ या कालावधीत अवेळी पावसामुळे मराठवाड्यात विशेषत: जालना जिल्ह्यात माहे मार्च व एप्रिल, २०१५ या कालावधील ७५५६.४८ हेक्टर क्षेत्रात शेती व फळ पिकांचे नुकसान झाले आहे. हिंगोली जिल्ह्यात दि. १ ते १५ एप्रिल, २०१५ या कालावधीत अवेळी पाऊस, गारपीट यामुळे १२६.५० हेक्टर क्षेत्रात फळपिकांचे नुकसान झाले असून, वीज पडून ८ जनावरे मृत झालेली आहेत. बीड जिल्ह्यात फेब्रुवारी-मार्च, २०१५ या कालावधीत १०००.०० हेक्टर क्षेत्रात पिकांचे नुकसान झाले असून एप्रिल, २०१५ मध्ये झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यात माहे फेब्रुवारी ते मे, २०१५ या कालावधीत ९००.४३ हेक्टर क्षेत्रात शेती व पिकांचे नुकसान झाले असून, वीज पडून ३ व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. नांदेड जिल्ह्यात जिरायत, बागायत व फळपिकांचे एकूण ३१६.३६ हेक्टर क्षेत्रात नुकसान झाले आहे. तसेच वाशिम जिल्ह्यात मार्च व एप्रिल, २०१५ मध्ये अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे ५९९५.७१ हेक्टर क्षेत्रात शेती/फळपिकांचे नुकसान झाले असून दि. १०.४.२०१५ रोजी वीज पडून २ व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय. हिंगोली जिल्ह्यात दिनांक १ ते १५ एप्रिल, २०१५ या कालावधीत एकूण १२६.५० हेक्टर क्षेत्रात फळपकिांचे नुकसान झाले असून, ५ घरांची अंशत: पडझड झालेली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) व (७) आपदग्रस्तांना मदत वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## खाजगी व अशासकीय दुध संस्था ग्राहकांकडून लिटरमागे जादा पैसे घेत असल्याबाबत

**(१२) * २००४० अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारच्या नियमानुसार बृहन्मुंबई दुग्ध योजनेअंतर्गत आरे डेअरी शेतकऱ्यांकडून दुधाची खरेदी करुन ग्राहकांना रास्त दरात दुध उत्पादन करुन देत असली तरी खाजगी व अशासकीय दुग्ध संस्था ग्राहकांकडून लिटरमागे पाच रुपये जादा वसूल करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी व अशासकीय दुध संस्थांवर सरकारचा अंकुश नसल्याने ते अनधिकृतपणे फुटपाथवर दुधाची विक्री करत असून या दुधाचा दर्जा आरे दुधा समान असतानाही तुलनेत ५ रुपये जास्त घेतले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती खाजगी व अशासकीय दुग्ध संस्थांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) शासनाने शासकीय दुधासाठी निश्चित केलेले दूध खरेदी व विक्रीचे दर हे शासकीय दुधाकरीता लागू असतात. खाजगी व अशासकीय दूध संस्थांनी दुधाची खरेदी व विक्री कोणत्या दराने करावी याबाबत कायदेशीर निर्बंध नाहीत. तथापि, शासकीय दूध विक्री दराच्या तुलनेत खाजगी व अशासकीय दुध संस्थांचे दूध विक्री दर जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे कलम २ (अ) (क) मधील तरतूदीनुसार जीवनावश्यक वस्तूच्या खरेदी-विक्रीचे दर नियंत्रित करण्यासाठी आदेश जारी करण्याचे अधिकार केंद्र शासनास असून ते संपूर्ण देशासाठी लागू होतात. सद्यस्थितीत सदर अधिनियमाखाली केंद्र शासनाने दुधाकरिता नियंत्रण दर निश्चित केलेले नाहीत. त्यामुळे सहकार व खाजगी क्षेत्रामार्फत विक्री करण्यात येणारे दर त्यांच्यामार्फत निश्चित केले जातात. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता, याप्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) खाजगी तसेच अशासकीय दूध संस्थांनी दूध विक्री दर कमी करावे असे शासनाकडून आवाहन करण्यात आले आहे. सदर आवाहनास अनुसरुन मदर डेअरी व महानंद यांनी त्यांचे दूध विक्री दर प्रति लिटर रु.२/- ने कमी केले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ब्रम्हपुरी (जि.सोलापूर) येथे महावितरण कंपनीच्या रोहित्रामधून पडलेल्या ठिणग्यांमुळे ऊस व ठिबक सिंचन यंत्रणा जळून खाक झाल्याबाबत**

**(१३) * १६६७२ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील ब्रम्हपुरी येथील बठाण रस्त्यावर असलेल्या महावितरण कंपनीच्या रोहित्रामधून दिनांक ९ मार्च, २०१५ रोजी पडलेल्या ठिणग्यांमुळे तेथील १० शेतकऱ्यांचा ६० एकर जमीनीवरील ऊस व ठिबक सिंचन यंत्रणा जळून शेतकऱ्यांचे सुमारे १ कोटी रुपयाचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संबंधीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) सदर आग विद्युत कारणाने लागली नसल्याने नुकसान भरपाई अनुज्ञेय नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कंत्राटी वीज कामगारांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत**

**(१४) * १९५९५ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जवळपास १०,००० कंत्राटी वीज कामगारांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, कोल्हापूर येथील महावितरणमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणा-या ८३ कर्मचाऱ्यांना माहे डिसेंबर, २०१४ मध्ये कामावरुन काढून टाकल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटी कामगारांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

महावितरण कंपनीच्या कोल्हापूर येथील क्षेत्रिय कार्यालयामधील ८३ बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर येथे नियमितपणे कामावर घेण्यासाठी दावे दाखल केले होते. सदर दाव्यांची सुनावणी होऊन मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांनी त्याचे अर्ज रद्दबादल ठरविल्याने, सदर बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांना ठेकेदाराने कामावरुन कमी केले होते. तद्नंतर रिक्त असलेल्या पदाच्या उपलब्धतेनुसार व कामाचे निकडीनुसार सदर ८३ बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांना ठेकेदाराने बाह्यस्त्रोत पध्दतीने पुन्हा तात्पुरत्या स्वरुपात कामावर घेतले आहे.
(३) मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि शासन निर्णयातील तरतुदीनुसार, कोणत्याही कंत्राटी कर्मचाऱ्यास कंपनीच्या सेवेमध्ये विहित भरती प्रक्रिया न करता, सामावून घेणे शक्य नाही. तथापि, कंपनीतील रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात दिल्यानंतर असे कर्मचारी इतर पात्र कर्मचाऱ्यांसोबत स्पर्धा करु शकतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**सन २०१३-१४ या वर्षात शेतकरी जनता अपघात विमा योजनेतील शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित असल्याबाबत**

**(१५) * २०४१९ श्री.बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी आयुक्तालयास २०१३-१४ या वर्षात शेतकरी जनता अपघात विमा योजनेतंर्गत राज्यभरातून १,९०८ विम्याचे प्रस्ताव प्राप्त झाले असून मागील पाच वर्षात १४,८७२ विम्याचे प्रकरण प्राप्त झाले, त्यामधून ४,५६७ प्रकरणामध्ये शेतक-यांना नुकसान भरपाई पासून वंचित ठेवण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये शासनाने २०.३६ लक्ष रु. विम्याच्या हप्ता अदा केलेला असूनही शेतक-यांना ११.५८ लक्ष रु. नुकसान भरपाई देण्यात आली हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विमा कंपन्याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशी अंती शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) शेतकरी जनता अपघात विमा योजनेअंतर्गत सन २०१३-१४ या वर्षी विमा कंपन्यांकडे एकूण २,७२९ विमा प्रस्ताव प्राप्त झाले. मागील पाच वर्षात १५,७४९ विमा प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. त्यामधून ४,२७१ विमा प्रस्ताव कंपन्यांकडून योजनेच्या अटी व शर्तीत बसत नसल्याने नाकारण्यात आलेले आहेत.
(२) सन २०१३-१४ या वर्षात योजनेंतर्गत शासनाने रु. २०.३६ कोटी इतका विमा हप्ता कंपन्यांना अदा केलेला असून त्यापोटी शेतकऱ्यांच्या वारसांना विमा कंपन्यांकडून रु. २०.९३ कोटी इतकी नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खेड तालुक्यातील चासकमान (जि.पुणे) धरणामुळे पुनर्वसित झालेल्या ३५० ते १५०० लोकसंख्या असलेल्या गावांना ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत

**(१६) * २०५३३ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यातील चासकमान, (जि.पुणे) धरणांमुळे पुनर्वसित झालेल्या ३५० ते १५०० लोकसंख्या असलेल्या गावांना ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत दिनांक ४ मार्च, २०१४ रोजी शासन निर्णय क्र.व्हीपीएम २०११/प्र.क्र.१९१/परा घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणांमुळे विस्थापित झालेल्या गावांना अद्यापही ग्रामपंचायतींचा दर्जा दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विस्थापित गावांना ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. दिनांक ०४ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पामुळे पुनर्वसित झालेल्या ३५० ते १००० लोकसंख्या असलेल्या वसाहतीत ग्रामपंचायती स्थापन करणेबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) व (३) खेड तालुक्यातील चासकमान, (जि.पुणे) धरणांमुळे विस्थापित झालेल्या २७ गावांपैकी २१ गावांमध्ये सद्य:स्थितीत ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत. मौजे धामणगाव बु. हे गाव एकलहरे या ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये, मौजे माजगाव हे सुरुकुंडी या ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये व मौजे पाभे हे गाव ग्रुप ग्रामपंचायत भोमाळे मध्ये समाविष्ट आहे.

मौजे कडु व मौजे कोयाळी आणि मौजे दरकवाडी या पुनर्वसित गावांसाठी ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचे प्रस्ताव दि.३ जुलै, २०१५ रोजी जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे प्राप्त झाले असून, सदर प्रस्ताव विहित पध्दतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पुणे यांचेकडून विभागीय आयुक्त, पुणे यांचे शिफारशीसह शासनास प्राप्त झाल्यास त्यावर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

तसेच, खेड तालुक्यातील चासकमान, (जि.पुणे) धरणामुळे विस्थापित झालेल्या ज्या गावांमध्ये ग्रामपंचायत अस्तित्वात नाही. अशा गावांमध्ये ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचे प्रस्ताव विहित पध्दतीने शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाने वितरीत केलेले राज्यातील शेतक-यांचे खरीप विमा ई. योजनांचे एकूण २२६९.२१ कोटी रुपयांचे अनुदान राज्य शासनाने रोखल्याबाबत

**(१७) * १८२४० श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने राज्यातील शेतक-यांचे खरीप विमा योजनेचे १६०० कोटी, सिंचन साहित्य खरेदी अनुदानाचे १३४.७४ कोटी, दुष्काळापोटी ५३२ कोटी तर फळपीक विमा योजनेचे २.४७ कोटी असे एकूण २२६९.२१ कोटी रुपयांचे अनुदान राज्य शासनास वितरीत करुनही राज्य शासनाने सदर अनुदान रोखल्यामुळे राज्यातील शेतक-यांना खरीप पिक विमा योजना, फळपीक विमा योजना इत्यादी योजनांचा अद्याप लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अंती राज्यातील शेतक-यांना अनुदान मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप २०१४ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांना देय ठरलेल्या पिक विमा भरपाईतील केंद्र शासनाच्या हिश्याच्या रु.६९०,७४,४१९४४.९० या रकमेपैकी रु.४५०,७४,४१९४४.९१ इतकी रक्कम भारतीय कृषि विमा कंपनीकडे प्राप्त झाली आहे. तर राज्य शासनाच्या हिश्याच्या रु.६९०,७४,४१९४४.९१ पैकी रु.६९०.७४ कोटी इतकी रक्कम भारतीय कृषि विमा कंपनीकडे जमा झाली असुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे वाटप भारतीय कृषि विमा कंपनीकडून करण्यात येत आहे.

सुक्ष्म सिंचन योजनेअंतर्गत सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने रु.१७७.५० कोटी इतक्या वार्षिक कृती आराखड्यास मंजूरी दिली असून सदरचा निधी पूर्णपणे खर्च करण्यात आलेला आहे.

खरीप २०१४ हंगामातील पिकबाधीत शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी केंद्र शासनाने राज्याला रु.१९६२.९९ कोटी इतकी मदत मंजूर केली असून ही वाटप करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

फळपिक विमा योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडील सुमारे रु.२६ कोटी इतके अनुदान सदर योजना राबविणाऱ्या चार विमा कंपन्यांकडे थेट जमा करण्यात आले असून विमा कंपन्याद्वारे नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांना देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सुमारे तीन लाख शेतक-यांनी कोटेशन भरुनही महावितरणने वीज जोडण्या दिल्या नसल्याबाबत**

**(१८) * १६८०५ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.भिमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे तीन लाख शेतक-यांनी कोटेशन भरुनही महावितरणने वीज जोडण्या दिल्या नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर सांगली, जिल्हयातील शेतक-यांच्या कृषी पंपाचे १९ हजार वीज जोडणी अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढ्या मोठया प्रमाणात वीज जोडण्या प्रलंबित असण्या मागची कारणे काय आहेत,

(४) यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही. राज्यात मे, २०१५ रोजी १८७२०५ कृषीपंप ग्राहक कोटेशन भरुन प्रलंबित आहेत.

(२) होय. मे, २०१५ अखेर कोल्हापूर परिमंडलातील कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ८१६४ व सांगली जिल्ह्यामध्ये ११५१४ असे एकूण १९६७८ इतके शेतीपंप वीज जोडणी अर्ज प्रलंबित आहे.

(३) शेतीपंपाच्या वीज जोडणीचे काम पायाभूत आराखडा-२ या योजनेतून करण्यात येत असून संबंधित कंत्राटदारास कामे जलदगतीने सुरु करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) शेतीपंपाच्या नवीन वीज जोडणीसाठी पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी उच्चदाब व लघुदाब वाहिनी, नवीन वितरण रोहित्रे (ट्रान्सफॉर्मर) इ. कामे महावितरणच्या इन्फ्रा-२ या योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत व ज्येष्ठतायादी नुसार शेतीपंपाना वीज पुरवठा करण्याचे कामे प्रगतीपथावर आहे. सदर कामे लवकर पूर्ण करण्यासाठी कंत्राटदाराकडे पाठपुरावा करण्यात येत असून, सदर कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील.

(५) कंत्राटदाराने तातडीने कामे पुर्ण न केल्यास कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. संबंधित इन्फ्रा-२ कंत्राटदारांना कामे जलदगतीने करण्यासाठी नोटीस टू करेक्ट व नोटीस टू टर्मिनेट देण्यात आलेल्या आहेत. कंत्राटदाराने तातडीने कामे पूर्ण न केल्यास कंत्राटच्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना तालुक्यातील देवमुर्ती ग्रामपंचायत हद्दीत अकृषक परवानगी नसताना प्लॉट विक्रीत कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) * २३७९३ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना तालुक्यातील देवमुर्ती ग्रामपंचायत हद्दीत अकृषक परवानगी नसताना ४०० ते ५०० एकर जमिनीमध्ये प्लॉटिंगची विक्री करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्लॉट विक्रीत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यामुळे उपविभागीय अधिकाऱ्यांनी जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व दुय्यम निबंधक यांना गटनिहाय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशानुसार चौकशी करण्यात आली आहे, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार दोषी व्यक्तींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) यासंदर्भात श्री.काशीनाथ सखाराम फुलझाडे या व्यक्तीने दि.११.०५.२०१५ अन्वये उपविभागीय अधिकारी, जालना यांच्याकडे तक्रार केली असून तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, जालना यांनी गट विकास अधिकारी, जालना व दुय्यम निबंधक, जालना यांना दि. २१.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थितीची पडताळणी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

(३) चौकशी अहवाल अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### सांगली जिल्हयामध्ये ज्यादा दराने युरिया खताची विक्री होत असल्याबाबत

**(२०) * २३३७० श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयामध्ये बहुतांश खत दुकानदार युरियाची कृत्रिम टंचाई निर्माण करुन ज्यादा दराने खताची विक्री करुन शेतक-यांची फसवणुक करत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधीत दोषींविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे गुंदवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे इंडियन ऑईल कॉर्पोरेशन व खाजगी कंपन्यांनी महसूल विभागाची परवानगी न घेता अनधिकृतपणे इमारती बांधल्याबाबत

**(२१) * २०७०४ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुंदवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे इंडियन ऑईल कॉर्पोरेशन व खाजगी कंपन्यांनी महसूल तसेच कोणत्याही विभागाची परवानगी न घेता अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात इमारती खाडी पात्रात बांधल्या असून सदर इमारती पाडून टाकण्याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पालकमंत्री, ठाणे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारती बांधण्यासाठी तेथील स्थानिक शेतकरी श्री. अंकुश म्हात्रे व सौ.शर्मिला म्हात्रे यांची शेतजमीन त्यांची परवानगी न घेता संबंधित स्थानिक अधिका-यांच्या संगनमताने त्यांच्या बनावट सह्या कागदपत्रांवर घेतल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित प्रकरणी मा.मुख्यमंत्री यांनी सदर अनधिकृत बांधकाम तोडण्याचे आदेश तहसिलदार-भिवंडी, प्रांत अधिकारी व एमएमआरडीए यांना देऊनही सदर अनधिकृत इमारतींचे बांधकाम अद्यापही पाडण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर परिसरात अनधिकृत बांधकाम करणा-या शासकीय व इतर कंपन्यांविरुध्द तसेच सदर अनधिकृत इमारतीचे बांधकाम पाडण्याचे मा.मुख्यमंत्री यांनी आदेश देऊनही अद्याप बांधकाम पाडण्यात आले नसल्याने तहसिलदार, प्रांत अधिकारी व इतर अधिका-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) जमिन मालक श्री. अंकुश कान्हा म्हात्रे व विकासक श्री.रुद्रप्रताप उर्मलिया त्रिपाठी यांच्यात वाद असल्याने श्री.म्हात्रे यांनी श्री.त्रिपाठी यांच्याविरुध्द दिवाणी दावा दाखल केला आहे.

(३) व (४) मौजे गुंदवली ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. २६/९ बाबत मा.दिवाणी न्यायालय, भिवंडी रे.मु.नं. ३९५/१५ अन्वये दावा दाखल असून सदर दावा दाखल करुन घेताना मा.दिवाणी न्यायालयाने पुढील सुनावणी पर्यंत जैसे थे परिस्थिती राखण्याचे आदेश दिले आहे. तसेच मौजे गुंदवली स.नं. ३१ ते ५१, ५३, ५५ व मौजे दिवे-अंजूर मधील स.नं. ३६ ते ३८ बाबत भिवंडी न्यायालयात, विशेष दिवाणी खटला क्र. ७४२/१२ हा दावा दाखल असून त्यातही जैसे थे असा मा. न्यायालयाने आदेश दिला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती विभागातील १८४ कृषी केंद्राचे परवाने गुणवत्तेचा अभाव आढळल्याने निलंबित केल्याबाबत**

**(२२) * २३१०७ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.रमेश बुंदिले (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील १८४ कृषी केंद्राचे परवाने गुणवत्तेचा अभाव आढळल्याने बियाणे, किटकनाशके आणि रासायनिक खतांचा विक्री करणाऱ्या विक्रेत्याचे परवाने रदद केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०१५ पर्यंत या सर्व विक्रेत्यांकडील बियाणे, खते आणि किटक नाशकांचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी केली असता त्यात दोष आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चांगल्या बियाण्याच्या नावाखाली काही कृषीसेवा विक्री केंद्रे शेतकऱ्यांना बनावट बियाणे व खतांचा पुरवठा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा बनावट बियाणे व खत विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

मार्च, २०१५ अखेर अमरावती विभागात २२ कृषि सेवा केंद्राचे परवाने कायमस्वरुपी रद्द करुन ४ कृषि सेवा केंद्राचे परवाने निलंबीत करण्यात आलेले आहेत. तसेच, विभागामध्ये १५८ कृषि सेवा केंद्रांचे परवाने विहीत मुदतीत नुतनिकरण न केल्याने रद्द करण्यात आलेले आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) विनापरवाना बनावट बियाणे व रासायनिक खत विक्रेत्यावर निरिक्षकांमार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येवून बियाणे व रासायनिक खताचा साठा जप्त करण्यात आलेला आहे. तसेच संबंधीतांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले असून पुढील पोलीस कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यात तापी नदीतून मोठ्या प्रमाणावर वाळूचा उपसा केला जात असल्याबाबत

**(२३) * २२८०३ श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साहूर, जुने कोडदे, हिसपूर, टाकरखेडा, कमखेडा, अमळथे, सुलवाडे, म्हळसर (ता.शिंदखेडा जि.धुळे) अशा विविध गावतील तापी नदीतून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वाळूचा उपसा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वाळू वाहतुकीमुळे सर्वच गावांचे रस्ते अत्यंत खराब झालेले असून त्यासाठी शासनाकडून मात्र रस्त्याच्या दुरूस्तीसाठी कोणताही निधी अद्याप देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार ज्या तालुक्यातून वाळू उपसा केला जातो त्या तालुक्याच्या गावांना रस्त्यांच्या कामासाठी निधी दिला जातो, तसेच ज्या गावाच्या सिमेतून वाळूचा उपसा केला जातो त्या गावांना निधी देण्याची तरतूद असतांना शिंदखेडा तालुक्याला मात्र गेल्या ५ वर्षात गौण खनिजाचा कोणताही निधी न देता दुसऱ्या तालुक्यांना शिंदखेडा तालुक्यापेक्षा अधिकचा निधी देण्यात येत आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्या नुसार चौकशीअंती कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्रश्नात नमूद केलेल्या वाळूसाठ्यांचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी सर्वेक्षण करुन, निश्चित केलेल्या वाळूचा नियमानुसार लिलाव करण्यात आला आहे. सदर वाळूगटातून निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा जास्त उत्खनन झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) वाळू वाहतूकीमुळे परिसरातील जोडरस्ते काही प्रमाणात खराब झाल्याने स्वामीत्वधनापोटी अनुदान वेळोवेळी वितरीत करण्यात आले आहे. तसेच शिंदखेडा तालुक्यासाठी सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या कालावधीत खनिज निधीपोटी एकूण रुपये ४९,५२,०४४/- एवढा निधी देण्यात आला आहे. सदर निधी धुळे जिल्हयातील धुळे, साक्री व शिरपूर या तालुक्यांना वरील कालावधीत खनिज निधीपोटी दिलेल्या निधी पेक्षा जास्त आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वाळकेश्वर समुद्रात विना परवाना मासेमारी करतांना पकडण्यात आलेल्या बोटीवर कारवाई करण्याबाबत**

**(२४) * १७५१४ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा-कळवा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाळकेश्वर समुद्रात विना परवाना पर्ससिन जाळीचा वापर करुन मासेमारी करणारी बोट स्थानिक कोळी बांधवानी पकडली असून याबाबत मत्स्य विभागाच्या अधिका-यांना बोलवून संबंधित बोटीवर कारवाई करण्याची मागणी केली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) संबंधिताविरुध्द महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अवकाळी पावसामुळे उध्वस्त झालेल्या अनेक आंबा बागायतदारांपैकी देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथील बागायतदाराने शासकीय मदत न मिळाल्यामुळे आत्महत्या केल्याबाबत

**(२५) * १६८७२ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात मागील ३ महिन्यात झालेल्या अवेळी पाऊस व गारपीटीमुळे आंबा, काजू बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू नुकसानीमुळे देवगड तालुक्यातील (जि.सिंधुदूर्ग) आंबा बागायतदार शेतकरी पांडुरंग कोल्हे याने कर्जबाजारीपणामुळे माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवडयात आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे बागायतदारांना आंब्याचे उत्पादन केवळ १० ते २० टक्के मिळाले असून काजू व अन्य फळबागायतदारांचेही प्रचंड प्रमाणात नुकसान झाल्यामुळे त्यांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी दिनांक ६ मे २०१५ रोजी मा.मुख्यमंत्र्याना एक लेखी निवेदन सादर करुन केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे कोकणातील आंबा, काजू व इतर नुकसान झालेल्या फळबागायतदारांना तसेच शेतकरी पांडुरंग कोल्हे यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे श्री.पांडूरंग हरी कोल्हे, रा.हिंदळे, ता.देवगड, जिल्हा सिंधुदूर्ग यांनी निरनिरळ्या बँकांमधून कर्जे घेतलेली होती. सदर कर्जाची हप्ते त्यांनी नियमितपणे भरलेले आहेत. प्राथमिक चौकशीमध्ये श्री.कोले यांनी दारुच्या नशेत मानसिक संतुलन बिघडल्याने दिनांक ०३/०५/२०१५ रोजी आत्महत्या केल्याची आढळून आलेले आहे.

(३) अवकाळी पाऊस व गारपिटीमूळे बाधीत झालेल्या शेतक-यांना आर्थिक मदत देण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींकडून शासनास मे, २०१५ मध्ये निवेदन प्राप्त झालेले आहे.

(४) राज्यात माहे फेब्रुवारी व मार्च, २०१५ मध्ये अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे बाधीत झालेल्या आंबा, काजू व इतर फळबागायतदारांना दिनांक १३/०४/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बहुवार्षिक पिके (फळबागांसाठी) रु.२५,०००/- प्रतिहेक्टरी अशी आर्थिक मदत जाहीर करण्यात आलेली आहे. सदर मदत वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

मयत श्री.पांडूरंग हरी कोले यांच्या कुटूंबियांसाठी आर्थिक मदत देण्याबाबतची बाब विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याच्या पूर्व भागातील उरुळी कांचन परिमंडळ कार्यक्षेत्रातील रोहित्रे चोरीला गेल्याबाबत**

**(२६) * १९२४६ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पुणे परिमंडळाच्या ग्रामीण भागातून सन २०१३-१४ मध्ये २०९ रोहित्रे, सन २०१४-१५ मध्ये १२६ रोहित्रे तसेच हवेली तालुक्याच्या पूर्व भागातील उरुळी कांचन परिमंडळ कार्यक्षेत्रातील २३ गावांमधून सन २०१४-२०१५ मध्ये ७० रोहित्रे चोरीला गेल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहित्रे चोरी गेल्यानंतर नवीन रोहित्रे बसविण्यासाठी शेतकऱ्यांना २ ते ३ महिने वाट पाहूनही रोहित्रे बसवून दिले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोहित्रांची होणारी चोरी थांबविण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही. चोरी गेलेली रोहित्रे संबंधित कार्यालयाकडून उपलब्धतेनुसार बसवून देण्यात आलेली आहेत.

(३) चोरी झालेल्या रोहित्रांचे संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंद करण्यात आलेले असून खबरदारीचे उपाय म्हणून रोहित्रे वेल्डींग करणे, तसेच आवश्यक तेव्हा स्थानिक पोलीसांबरोबर रात्रीच्या वेळी गस्त घालणे, रोहित्रे चोरी होऊ नयेत यासाठी गस्ती पथक तयार करणे इ. उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अतिवृष्टीमुळे विदर्भातील नुकसानग्रस्त मच्छीमारांना अद्यापही नुकसान भरपाई निधी वितरीत करण्यात न आल्याबाबत**

**(२७) * २२०६३ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३ च्या जून ते सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे विदर्भातील वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील मच्छीमारी संस्थांच्या तलावातील मासे, मत्स्यबीज, होडया, जुना मत्स्यसाठा, जाळे यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन या नुकसानीची भरपाई म्हणून दिनांक २७ मार्च २०१५ रोजीच्या महसुल व वन विभागाच्या शासन निर्णय प्रमाणे ११.७० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी विदर्भातील वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील नुकसानग्रस्त मच्छीमारांना अद्यापही वितरीत करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले, त्यानुषंगाने नुकसानग्रस्त मच्छीमारांना नुकसान भरपाई तातडीने देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. गडचिरोली व वर्धा जिल्ह्यांमध्ये काही लाभार्थींना अंशत: अनुदानाचे वितरण करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) सहायक आयुक्त, मत्स्य व्यवसाय नागपूर यांना अद्‌याप पर्यंत निधी प्राप्त न झाल्यामुळे, भंडारा व गोंदिया जिल्ह्यांमध्ये आचारसंहिता लागू असल्यामुळे व विभागातील लाभार्थीच्या/मच्छिमारांच्या बँक खात्यांची परिपूर्ण माहिती न मिळाल्यामुळे अनुदान वाटपास विलंब झालेला आहे.

-----------------

**मच्छीमारांना शासनाकडून मिळणाऱ्या डिझेल व सबसिडीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२८) * १७७५८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) येथील बोर्ली मांडला येथील सागरपुत्र मच्छीमार सोसायटीच्या संचालक मंडळाने बनावट सदस्यांची नोंदणी करुन त्यांच्या नांवावर बोटी खरेदी केल्या असे दाखवुन मच्छीमारांना मिळणाऱ्या सरकारी डिझेल व सबसिडीमध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अस्तित्वात नसलेल्या २५ पेक्षा अधिक बोटींना सन २००७ पासून लाखो रुपयांचे डिझेल वितरीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने लाखो रुपयांच्या सबसिडी गैरव्यवहाराप्रकरणी रेवंदडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी दोषी असणाऱ्या सर्व संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे. तथापि सदर संस्था ही नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) येथील नसून बोर्ली मांडला (ता.मुरुड, जि.रायगड) येथील आहे.

(२) होय. अंशतः खरे आहे. अस्तित्वात नसलेल्या एकूण १८ मासेमारी नौकांसाठी डिझेल उचल करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) होय.

(४) व (५) होय. रेवदंडा पोलीस ठाण्यामध्ये गु.र.नं. ८८/२०१३ अन्वये संस्थेचे चेअरमन व संचालक मंडळाविरुध्द गुन्हा दाखल असून पुढील तपास चालू आहे. संबंधित अधिका-यांस ४८ तासापेक्षा जास्त पोलीस कोठडी मिळाल्यामुळे निलंबित करण्यात आले आहे. संबंधित संस्थेविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम, १९६० च्या कलम ७८ अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यात किनाऱ्यावरील ३८५ व पायथ्याशी असलेल्या ८४ गावांमध्ये पावसाळयात आपत्तीजन्य परिस्थिती उद्‌भवण्याची शक्यता वर्तविण्यात आल्याबाबत**

**(२९) * १९५२५ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात किनाऱ्यावरील ३८५ तर पायथ्याशी असलेल्या ८४ गावे पावसाळ्यात पुराच्या कक्षेत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३८५ गावे पुरस्थितीच्या कक्षेत असून गावनिहाय आराखडे तयार करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) रायगड जिल्ह्यामध्ये नदी किनारी २७३ गांवे, समुद्र किनारी ५३ गांवे व खाडी किनारी ८१ गावे वसलेली आहेत. अतिवृष्टी, धरण विसर्ग व समुद्र भरती यांची वेळ एकच आल्यास सखल भागामध्ये पूर परिस्थती निर्माण होण्याची शक्यता असते.

(२) आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे दरवर्षी अद्ययावत केले जातात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रामटेक (जि. नागपुर) तालुक्यातील ३२१ शेतक-यांना तहसिल कार्यालयातील अधिका-यांचा चुकीमुळे नुकसान भरपाई पासुन वंचित रहावे लागल्याबाबत**

**(३०) * २११४० डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील ३२१ शेतक-यांना तहसिल कार्यालयातील अधिका-यांच्या चुकीमुळे नुकसान भरपाई पासुन वंचित ठेवण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २०१४-१५ च्या खरीप हंगामात राज्यातील शेतकरी संकटात असल्याने शासनाच्या वतीने ३२१ शेतक-यांना १७,०५,०२१ रुपयांचे धनादेश स्टेट बँकेत तसेच बँक ऑफ बडोदा येथे देण्यात आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, धनादेश वाटप करण्यास दुर्लक्ष करणा-या अधिकारी कर्मचा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) रामटेक तालुक्यातील स्टेट बँक ऑफ इंडिया, रामटेक यांचेकडे तहसिलदार, रामटेक यांचे पत्र क्र.कानुनगो/तह.राम/कावि-१०९/२०१५, दि.२३/५/२०१५ अन्वये ३२१ शेतक-यांच्या नावाची यादी व रक्कम रु.१६,५२,०२१/- धनादेश क्र.००२५४८, दि.२३/१/२०१५ अन्वये पाठविण्यात आली होती. तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया, रामटेक यांनी शेतक-यांच्या बँक खात्यात रक्कम जमा केल्याबाबत Remmitance Certificate तहसील कार्यालय, रामटेकला सादर केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीतून शासनास प्राप्त झालेल्या जमिनीची नियमांचे उल्लंघन करुन विक्री केल्याबाबत**

**(३१) * २०३२५ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन पुरस्कृत आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत वर्धा जिल्हयात १९८०.४९ हेक्टर जमिन शासनास प्राप्त झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूदान जमीनीचे हस्तांतरण व व्रिकी होत नसतांनाही नियमांचे उल्लंघन करुन मोठया प्रमाणात शासकीय जमीन खाजगी संस्था, व्यापारी व कंपन्यांना विक्री केल्याचे माहितीच्या अधिकाराखाली निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यापैकी वर्धा मंडळातील एका जमीन धारक संस्थेला भूदान जमिनीतून खरेदी केलेल्या जमिनीवर ३ बँकांनी ९८ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वर्धा जिल्हयात भूदान चळवळीतून शासनास प्राप्त झालेल्या सदरहू जमिनीच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर व खरेदी करणाऱ्या संस्था चालकांवर, व्यापाऱ्यांवर व कंपन्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) आचार्य विनोबा भावे यांच्या भुदान चळवळीत वर्धा जिल्हृयात १९८०.८९ हेक्टर जमीन भुदान यज्ञ मंडळास प्राप्त झाली होती.

(२) वर्धा जिल्हृयात काही प्रकरणी भुदान जमीनीचे अनधिकृत हस्तांतरण किंवा अकृषक वापर झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियमान्वये पुरविण्यात आलेली आहे.

(३) होय. वर्धा तालुक्यातील सावंगी (मेघे) गावातील भुमापन क्र.१२० च्या गा.न.नं.७/१२ वर एकूण रुपये ११५.१२ कोटी एवढ्या कर्जाची नोंद दिसून येते.

(४) व (५) याबाबत संबंधीत उपविभागीय अधिकारी यांना मध्यप्रदेश भुदान यज्ञ अधिनियम, १९५३ अन्वये कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या कार्यालयाच्या पत्र दिनांक २४/०६/२०१५ अन्वये कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने चौकशीचा अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मनसर (जि.नागपूर) व सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यात अवैधरीत्या वाळू उपसा व वाहतुक होत असल्याबाबत**

**(३२) * २२८२८ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनसर नजिकच्या कांद्री (माईन्स) (जि.नागपूर) परिसरात अवैध रेती वाहतुकीचे ट्रक पकडण्यात आल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) सावली तालुक्यातील (जि.चंद्रपूर) सहापैकी काही रेती घाटांचे आणि घरांच्या पायाभरणीसाठी वापरण्यात येणा-या वाळूचा लिलाव झालेला नसताना या घाटांवरुन सर्रास वाळू उपसा होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व प्रश्न भाग (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रेती उपसा करणाऱ्यांवर व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) अशा बाबी निदर्शनास आल्या नाहीत. मात्र गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीस आळा घालण्यासाठी तहसिल स्तरावर गठीत करण्यात आलेल्या पथकाने माहे एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत रामटेक तालुक्यात ४ प्रकरणात रु.७४,२००/- इतका दंड वसूल केला असून, सावली तालुक्यात १२ प्रकरणांत रु.१,४४,२००/- इतका दंड वसूल केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्हयातील ३६ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या**

**(३३) * १९१६७ श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व),**

**श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हातील ३६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) चांदसणी (ता.चोपडा, जि.जळगांव) येथील वसंत अमृत पाटील व इंदूबाई वसंत पाटील या शेतकरी दाम्पत्याने आजारपण व नापिकीला कंटाळून गळफास घेऊन तसेच तरे टोळी (ता.पारोळा) येथील ज्ञानेश्वर निंबा पाचुंदे यांनी विष प्राशन करुन आत्महत्या केल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नेरले (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील श्री.शिवाजी बाजारात गवळी या शेतकऱ्याने खाजगी सावकाराच्या कर्जाला व जाचाला कंटाळून दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली हे खरे आहे काय,

(४) दोंडाईचा, दत्ताणे, कर्ले (जि.धुळे) यासह शिंदखेडा तालुक्यात अनेक ठिकाणी गेल्या ४ ते ५ महिन्यात शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती आत्महत्या थांबविण्यासाठी तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे. नाशिक जिल्ह्यात माहे जानेवारी २०१५ ते दि. २५ जुन, २०१५ या कालावधीत २३ शेतकरी आत्महत्या निदर्शनास आल्या आहेत.

(२) होय. माहे मे, २०१५ मध्ये वसंत अमृत पाटील व इंदुबाई वसंत पाटील, रा.चांदसणी, ता.चोपडा, जि.जळगाव या शेतकरी दाम्पत्याने आजारपणामुळे व एकटेपणामुळे आलेल्या नैराश्यातून गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच ज्ञानेश्वर निंबा पाचुंदे, रा.टोळी, ता.पारोळे, जि.जळगाव यांनी विष प्राशन करुन आत्महत्या केल्याची घटना घडलेली आहे.

(३) अंशत: खरे आहे. मयत शेतकऱ्यांच्या पत्नीने अशी तक्रार केली असून तद्नुषंगाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत गवळी यांनी सावकारी कर्ज फेडण्याकरिता एच.डी.एफ.सी. बँकेकडून कर्ज घेतले असल्याचे व या कर्जाबाबत सदर बँकेकडून तगादा झाल्या नसल्याचे चौकशीत दिसून आले आहे.

(४) व (५) धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यात जानेवारी, २०१५ ते मे, २०१५ या कालावधीत ०७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे. चौकशीअंती यातील ०३ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. ०१ प्रकरण चौकशीसाठी प्रलंबित आहे. सदर पात्र प्रकरणी मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबियास रु.१.०० लक्ष मदत देण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात अल्पसंख्याक दर्जा असलेल्या शैक्षणिक संस्थामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये त्रुटी असल्याबाबत**

**(३४) * १८१६४ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती मोनिका राजळे (शेगाव), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या २४७२ शिक्षण संस्थांना शासनाने परवानगी दिली असून, यातील बहुतांश संस्थांच्या शाळात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याऐवजी इतर समाजाच्या विद्यार्थ्यांनाच अधिक संख्येने प्रवेश देण्यात येत असल्याने, या सर्व संस्थांची चौकशी करण्याचे आदेश मा.अल्पसंख्यांक कल्याण मंत्री यांनी दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) दक्षिण मुंबईतील तब्बल १२७ पैकी ८७ शाळांमध्ये गेल्या तीन वर्षात अल्पसंख्यांक समाजाच्या किमान ३५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) राज्यात अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या शैक्षणिक संस्थामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या प्रवेश प्रक्रियेमध्ये असलेल्या त्रुटी, अल्पसंख्यांक शाळांतील शैक्षणिक दर्जा व संस्थांच्या शैक्षणिक कारभार या अनुषंगाने राज्यातील २३०० अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, सदर चौकशीसाठी शासनाने काय निकष निश्चित केले आहेत,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अशा संस्थांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय शिक्षण निरिक्षक, दक्षिण मुंबई यांनी शासनास सादर केलेल्या अहवालानुसार प्रथमदर्शनी ही बाब निदर्शनास आली आहे.

(३), (४) व (५) अंशत: खरे आहे. ज्या अल्पसंख्याक संस्थांच्या शाळांनी त्यांना असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या विद्यार्थ्यांना अल्प प्रमाणात प्रवेश दिले आहेत. अशा दक्षिण मुंबईतील अल्पसंख्याक संस्थाना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. या प्रकरणी शासन निर्णय अ.वि.वि.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दि.२७.०५.२०१३ प्रमाणे विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयातील अधिका-यांनी शेकडो शेतकऱ्यांच्या नावे बनावट प्रस्ताव तयार केल्याबाबत**

**(३५) * १७३७३ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयातील अधिका-यांनी शेकडो शेतकऱ्यांच्या नावे बनावट प्रस्ताव तयार करुन ठिंबक सिंचन संचासाठी देण्यात येणारे कोट्यवधी रुपयांचे अनुदान गिळंकृत केले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अपहारप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने संबंधीत अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**जेवराळा (जि.भंडारा) येथे मागील एक-दोन वर्षापासून अतिवृष्टी व कोरडा दुष्काळ यामुळे धान पिकांचे उत्पादन कमी प्रमाणात आल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत**

**(३६) * २१२७१ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेवराळा (जि.भंडारा) येथे मागील एक-दोन वर्षापासून अतिवृष्टी व कोरडा दुष्काळ यामुळे धान पिकांचे उत्पादन कमी प्रमाणात आल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा कंपनीने मात्र नुकसानीमुळे झालेल्या धान पिक विम्याचा लाभ दिला नसून शेतकऱ्यांनी काढलेल्या लाखो रुपयांचा एकविमा रक्कम कंपनीने बळकाविली असून विम्याचा लाभ मात्र अनेक वर्षापासून दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी काढलेल्या लाखो रुपयांचा एकविमा रक्कम बळकाविलेल्या कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळवून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

जेवराळा हे गाव महसुल मंडळ पालांदुर, ता.लाखनी, जि.भंडारामध्ये समाविष्ट असून महसुल मंडळस्तरावर घेण्यात येणाऱ्या पीक कापणी प्रयोगानंसार भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील पालांदुर मंडळाचे धान पिकाचे सरासरी उत्पन्न सन २०१३-१४ मध्ये १३३९ कि.ग्रॅ./हे. होते तर सन २०१४-१५ मध्ये सरासरी उत्पन्न ९८६ कि.ग्रॅ./हे. आलेले आहे.

(२) राष्ट्रीय कृषि विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यात क्षेत्र हा घटक (Area Approach) धरुन भारतीय कृषि विमा कंपनी मार्फतक राबविण्यात येत आहे.

खरीप हंगाम २०१३ मध्ये या योजनेअंतर्गत भंडारा जिल्ह्यातील २१,७८२ शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग घेतला असून रु. ३५०.४१ लाख विमा हप्ता भरुन २६,२३५ हे. क्षेत्र विमा सरंक्षीत केले होते. त्यापैकी १०४ शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून त्यांना रु. ५.०६ लाख नुकसान भरपाई भारतीय कृषी विमा

कंपनीमार्फत अदा करण्यात आली आहे. यामध्ये जेवराळा (महसुल मंडळ पालांदूर, ता.लाखनी, जि.भंडारा) येथील धान पिकासाठी योजनेच्या तरतुदीनुसार नुकसान भरपाई देय होत नाही.

खरीप हंगाम २०१४ मध्ये या योजनेअंतर्गत भंडारा जिल्ह्यातील १६,००० शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग घेतला असून रु. १७४.९६ लाख विमा हप्ता भरुन २१,००० हे. क्षेत्र विमा सरंक्षीत केले होते. त्यापैकी २००० शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून त्यांना रु. ३७.०१ नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत सुरु आहे. या योजनेअंतर्गत भात पिकाचा विमा केलेल्या पालांदुर महसुल मंडळातील एकुण १,९३७ शेतकऱ्यांना रु. ३६,५४,१३५.१६ नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत देय होत असून सदरची रक्कम संबंधित बँकामार्फत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मेळघाट (जि.अमरावती) क्षेत्रात ग्रामिण पाणी पुरवठा योजनांना सौर उर्जा आधारित पंप बसविण्याबाबत**

**(३७) * २४०६८ डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट क्षेत्रातील विद्युत पुरवठयाची अडचण असलेल्या १०० गावांमधील पाणी पुरवठा योजनांसाठी सौर उर्जा आधारित पंप बसविण्याचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, ग्रामीण पुरवठा विभाग, अमरावती द्वारा जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मेळघाटातील बहुंताश गावामध्ये नियमित व पुरेसा विद्युत पुरवठा होत नसल्याने सौर उर्जा आधारित पंप बसविण्यात यावे या आशयाचे एक पत्र विधानसभा सदस्य, अमरावती यानी मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही निवेदनाचे अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दि.०२.०६.२०१५ चे निवेदन मा.मंत्री, उर्जा यांच्या कार्यालयात प्राप्त झाले असून, सदर निवेदनाच्या अनुषंगाने उर्जा विभाग, पाणी पुरवठा विभाग व आदिवासी विकास विभागातील अधिका-यांची बैठक मा.मंत्री (उर्जा) यांचेकडे घेण्याबाबतची कार्यवाही उर्जा विभागाकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील सटाणा तहसिलदारांनी नवीन शर्तीच्या जमिनीच्या खरेदी-विक्रीस दिलेली बेकायदेशीर परवानगी

**(३८) * २३१३१ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील सटाणा तालुक्यात कार्यरत असलेल्या तहसिलदारांनी शासनाचे अधिकार परस्पर स्वत:कडे ठेवून नवीन शर्तीच्या शेत जमिनी खरेदी विक्रीस मान्यता दिल्याने ४० एकर क्षेत्रापेक्षा जास्त जमीन देवून गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) (२) व (३) प्रश्नाधिन प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांनी केलेल्या चौकशीत तहसिलदार, बागलाण (सटाणा) यांनी अधिकारबाहयरित्या काही प्रकरणात नवीन शर्तीच्या भोगवटादार वर्ग-२ च्या शेतजमीनींच्या खरेदी विक्रीस परवानगी दिल्याचे निदर्शनास आले आहे. चौकशीतील निष्कर्षाच्या आधारे अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांनी संबंधित जमीनी सरकार जमा करण्याबाबत आदेश पारित केले आहेत. तसेच या प्रकरणाशी संबंधीत तहसिलदार, बागलाण (सटाणा) यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व

अपिल) नियम १९७९ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे. या प्रकरणाशी संबंधित अन्य अधिकारी/कर्मचारी यांची देखिल जबाबदारी निश्चित करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत**

**(३९) * १८९७७ श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी चक्रीवादळाने जबरदस्त ताडाखा दिल्याने ताम्हणे, मोसम, मोरोशी, केळवली कोंडोशी निरवरेसह अनेक गावात अनेक घरे गोठ्यांवरील कौले, पत्रे उडून गेल्याने १५० पेक्षा अधिक कुटुंबे बेघर झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हसोळ येथे झाड कोसळल्याने रुखसाना मीर ही महिला मरण पावली तिच्या घरातील तीन लहान मुले गंभीररित्या जखमी झाले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार नुकसानग्रस्तांना मदत देणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) होय. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात दिनांक २७.४.२०१५ रोजीच्या वादळाने मौजे हसोळ तर्फ येथील श्रीमती रुकसाना सुलेमान मीर यांच्या घरावर वडाचे झाड कोसळून सदर महिला मृत झाली असून तिच्या घरात असलेली तीन लहान मुले जखमी आहेत. मृत व्यक्तीच्या वारसास व जखमींना निकषानुसार अनुदान वाटप करण्यात येत आहे. तसेच ज्या गावांना वादळी वाऱ्याचा तडाखा बसला आहे, अशा गावातील पात्र आपदग्रस्तांना अनुदान वाटप करण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कुक्कुटपालन सहकारी संस्थांनी शासनाचे कोट्यवधी रुपयांचे भागभांडवल आणि कर्ज थकीत ठेवल्याबाबत**

**(४०) * १९४४९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुक्कुटपालन सहकारी संस्थाना राज्य शासनाने कर्ज व भागभांडवलाच्या रुपाने दिलेल्या १२४ कोटींची परतफेड करण्यात आलेली नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने कर्ज व भागभांडवल दिलेल्या ७३ पैकी केवळ २० संस्था सुरु असून तीनच संस्थांनी कर्ज आणि भागभांडवल १०० टक्के परत केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अंती सदर भागभांडवल व कर्ज वसूल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हो, हे अंशत: खरे असून रु.१२८.५१७९ कोटी थकीत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

(४) सदर संस्थांकडील थकीत वसूली करीता सहकार विभागाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदींचा अवलंब करुन, रकमेची वसुली करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र पुनर्वसन आयुक्तालयाची स्थापना करण्याबाबत

**(४१) * २१४८८ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राज्यातील विविध प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनवर्सनासाठी स्वतंत्र पुनवर्सन आयुक्तालयाची स्थापना करावी तसेच कोल्हापूर जिल्हयातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी मंजूर झालेल्या कामासाठी निधी मंजूर करावा अशी मागणी दिनांक २३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे धरणग्रस्त संघटनेने केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच भंडारा जिल्हयातील साकोली तालुकाअंतर्गत विहिरगांव (बुराड्या) आणि वटेटेकर (खंडाळा) ही गावे चुलबंद नदीच्या पात्रानजीक असून त्यांचे सन १९७८ मध्ये सानगडी व खंडाळा येथे पुनर्वसन करण्यात आले असून या दोन्ही गावांचे गेल्या ३७ वर्षापासून पुर्नवसन झाले नसल्याचे माहे जुन, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच जसाणे (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या गावाचे पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून नवीन पुनर्वसन गावासाठी जागा देखील निश्चित करण्यात आली असून उक्त गावातील ग्रामस्थ गेल्या ४० वर्षापासून पुनर्वसनासाठी तयार असतांना शासनाच्या विलंबामुळे त्यांना सातत्याने तापी नदीला येणाऱ्या महापुराचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या मागणी संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, सारंगखेडा बॅरेजचे पाणी जसाणे गावाच्या पायथ्याशी असल्याने गावात मोठ्या प्रमाणात सर्प, विंचू इत्यादी विषारी प्राण्याचा सर्रास वावर होत असल्याने गावाचे पुनर्वसन करावे अशी मागणी शिंदखेड्याच्या लोकप्रतिनिधींसह ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त गावांचे तातडीने पुनर्वसन करण्याबाबत, विविध प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनवर्सनासाठी स्वतंत्र पुनवर्सन आयुक्तालयाची स्थापना करण्याबाबत तसेच कोल्हापूर जिल्हयातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी मंजूर झालेल्या कामासाठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

तथापि, वारणा प्रकल्प यंत्रणेने कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील नागरी सुविधा कामांसाठी दिनांक २३/५/२०१५ रोजी निधी मागणी प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

साकोली तालुक्यातील मौ.विहीरगांव (बुराड्या) येथील पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी पात्र कुटुंबांना १२७ भूखंड वाटप करण्यात आले आहेत. तसेच मौ. वटेटेकर येथील पूरग्रस्तांपैकी १४ कुटुंबानी पुनर्वसनास नकार दर्शविल्याची नोंद असून उर्वरित पूरग्रस्तांना ३२ भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

मौजे जसाणे गावाचे पुनर्वसनासाठी गट नंबर ४३/१, ४३/२, ४४, ४५, ४६ मधील एकूण ८ हेक्टर १२ जमीन संपादीत केलेली आहे. शासन निर्णय क्र.सीएलएस-११०५/प्र.क्र.२३९/म-३, दि. २जून, २००६ अन्वये शासनाने नेमलेल्या अभियांत्रिकी, पर्यवेक्षकिय, व्यवस्थापकीय सल्लागार टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेल यांनी पुनर्वसन करावयाच्या कामाची व्याप्ती व संनियंत्रणाबाबत कार्यवाही करायच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, धुळे यांनी यांच्या दिनांक २९/३/२००७ च्या पत्रान्वये सदर प्रकल्पाचे प्रोजेक्टर डायरेक्टर यांना शिदंखेडा तालुक्यातील एकूण १९ गावांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये जसाणे गावाचा देखील समावेश आहे. सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) स्वतंत्र पुनर्वसन आयुक्तालयाची स्थापना करण्याच्या प्रस्ताव विभागास प्राप्त झालेला नाही. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील अभयारण्य प्रकल्पांतील पुनर्वसनांगतर्गत नागरी सुविधा कामांसाठी पुनर्वसन विभागामार्फत निधी उपलब्धकरुन दिला जात नाही. त्यामुळे या संदर्भात आवश्यक निधी मागणी वन विभागास सादर करण्याबाबत कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर यांना शासनपत्र दि. २०/४/२०१५ अन्वये कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटूंबाला तातडीने मदत देण्याबाबत**

**(४२) * १७०६३ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.त्र्यंबक भिसे (लातूर ग्रामिण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात व विदर्भामध्ये माहे जानेवारी ते मार्च, २०१५ या कालावधीत नापिकी, सावकार, सोसायट्या, बँकेचे कर्ज यासह अन्य कारणाने २६८ शेतक-यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी ७४ प्रकरणांची अद्यापही चौकशी सुरु असून चौकशीसाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २६८ आत्महत्याग्रस्त शेतक-यांपैकी १५८ शेतकरी मदतीस पात्र ठरले, त्यापैकी ११८ शेतक-यांच्या कुटूंबालाच मदत देण्यात आली, ४० जण अद्यापही प्रशासनाच्या प्रतिक्षा यादीवर आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय धोरणानुसार देण्यात येणारी १ लाख रुपयांची मदत नांदेड, उस्मानाबाद, हिंगोली, लातूर या जिल्हयातील शेतक-यांना देण्यास प्रशासनाकडून विलंब केला जात असल्याची बाब संबंधित शेतक-यांच्या वारसांनी विभागीय आयुक्त यांच्या दिनांक ५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणून दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यवतमाळ, उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये शेतकरी आत्महत्येचे प्रमाण लक्षात घेऊन शासनाने विशेष अधिकारी यांची नेमणूक केली असून या अधिका-यांमार्फत आत्महत्या व कृषी समस्यांबाबत शासनाकडून सर्वेक्षण करण्यात येत असून सर्वेक्षण पूर्ण झाल्यावर शेतक-यांच्या कुटूंबांना सर्व प्रकारची शासकीय मदत मिळवून देणे, शेतक-यांना आत्महत्येपासून परावृत्त करणे यासाठी हे अधिकारी काम करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटूंबाला तातडीने मदत देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) नाही. शेतकरी आत्महत्या प्रकरणी चौकशीसाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढलेली नाही. तसेच पात्र ठरलेल्या सर्व प्रकरणी संबंधीतांना मदत देण्यात आली आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतकरी आत्महत्या प्रकरणांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| विभाग | एकूण | पात्र | अपात्र | चौकशीसाठी प्रलंबित | मदत दिलेली |
|---|---|---|---|---|---|
| अमरावती | २४८ | १६५ | ७५ | ०८ | १६५ |
| नागपूर | ८४ | ६२ | २० | ०२ | ६२ |
| औरंगाबाद | २१४ | १६३ | ४३ | ०८ | १६३ |
| एकूण | ५४६ | ३९० | १३८ | १८ | ३९० |

(३) नाही.

(४), (५) व (६) शेतकरी आत्महत्या संदर्भात ठोस उपाययोजना करण्यासाठी शेतकऱ्यांबाबतची सविस्तर माहिती संकलित करण्यासाठी विदर्भातील यवतमाळ व मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यांची पथदर्शी प्रकल्प म्हणुन निवड करण्यात आली आहे. तद्नुषंगाने आत्महत्याग्रस्त व आत्महत्याप्रवण क्षेत्रास विशेष मदत व सहाय्य करण्यासाठी सदर दोन जिल्ह्यातील प्रत्येक उप विभागाकरिता सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आली आहे. या संदर्भात शेतकऱ्यांच्या सर्वेक्षणाचे व माहिती संकलित करण्याचे काम सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्ह्यात जादा दराने युरिया खताची विक्री होत असल्याबाबत**

**(४३) * २२०४१ श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात वाहतूक भाडे, राज्यांतर्गत कर, स्थानिक कर यांचा समावेश करुनच एमआरपी ठरवली जात असतांना आणि पोत्यावर तसा उल्लेख असतानाही शेतक-यांनी जादा दराने युरिया खताची विक्री होत असल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी सेवा केंद्र वाहतूक भाडयाचे नांव पुढे करुन साधा युरिया २५ तर निमकोटेड युरिया एमआरपीपेक्षा ३५ रुपये जास्त दराने विक्री करित आहेत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) त्यानुषंगाने या प्रकारास आळा घालण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) कोल्हापूर जिल्ह्यात एकुण ३६ गुणनियंत्रण निरीक्षक कार्यरत आहेत, या निरीक्षकांमार्फत जिल्ह्यातील सर्व कृषि सेवा केंद्राची तपासणी करण्यात येते. प्रत्येक तालुक्यात ०१ या प्रमाणे १२ तालुक्यात १२ व जिल्ह्यास्तरावर०१ अशी एकुण १३

भरारी/दक्षता पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच प्रत्येक तालुका कृषि अधिकारी, कार्यालयात १ व जिल्हा कार्यालयात १ एकुण १३ नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आलेली असुन सदर नियंत्रण कक्षाद्वारे शेतक-यांच्या शेतीविषयक कोणत्याही समस्यांना मार्गदर्शन केले जाते व त्यांचे निराकरण केले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली शहरातील पेठ भागातील शासकीय भुखंड शैक्षणिक कामासाठी भारती विद्यापीठास दिल्याबाबत

**(४४) * २४६८७ श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरातील (जि.सांगली) पेठ भागातील सर्व्हे नं.९७० मधील २२७४.३० चौ.मी.चा शासकीय भुखंड शैक्षणिक कामासाठी भारती विद्यापीठास दिला असून सदर जागेवर ३७१.२० चौ.मी.जागा शासनास बांधून देऊन हस्तांतरण करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारती विद्यापीठामार्फत सर्व शर्ती व अटीचा भंग करुन संपूर्ण जागा व्यापारी पध्दतीने वापरल्याने जिल्हाधिकाऱ्यांकडून रु.१४,७०,९३७.५० भाडे आकारण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भारती विद्यापीठाने सर्व शर्ती व अटीचा भंग केल्याने दिलेला भुखंड शासन काढून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) शासन ज्ञापन दि.२५/११/१९८३ अन्वये सांगली जिल्ह्यातील सि.स.नं.९७० येथील २२७४.३० चौ.मि. जागा भारती विद्यापीठ, पुणे यांना शैक्षणिक उपक्रमासाठी मंजूर करण्यात आली असून सदर संस्थेने ज्ञापनातील अटी प्रमाणे ४७८.८० चौ.मि. एवढी जागा शासनास बांधुन देणे आवश्यक होते. परंतु संस्थेने १०७.६० चौ.मि. एवढी जागा शासनास दिलेली असून ३७१.२० चौ.मि. जागा शासनास हस्तांतरण करणे बाकी आहे. तसेच सदर संस्थेला एकूण बांधकाम क्षेत्राच्या १५ टक्के एवढे बांधकाम क्षेत्र वाणिज्य प्रयोजनार्थ वापरण्यास शासनाच्या दि.१३/१२/१९८९ च्या पत्रान्वये परवानगी देण्यात आली असून त्यानुसार संस्थेस

१९९४-९५ पासून पाच वर्षाच्या कालावधीची भाडेपट्याची रक्कम रुपये १४,७०,९३७.५० भरण्यास जिल्हाधिकाऱ्यांकडून एप्रिल, २००० मध्ये कळविण्यात आले होते, हे खरे आहे.
(३), (४) व (५) प्रस्तुत बाब क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली असता, या संदर्भात शासन स्तरावर बैठक झालेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडूनही या प्रकरणी सविस्तर अहवाल प्राप्त झाला आहे. प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने छाननी करुन उचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**खामगाव (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांनी शेतातील टॉवरचा मोबदला मागितल्यावर वीज कंपन्यांनी त्या शेतक-यांवर खोटया केसेस करुन पोलिसांच्या ताब्यात दिल्याबाबत**

**(४५) * १९७५७ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथील शेतक-यांच्या शेतात त्यांची कोणतीही परवानगी न घेता विद्युत कंपन्या वीज वाहिनी टॉवर उभारत असून त्यांचा मोबदला मागितल्यावर त्या शेतक-यांवर खोटया केसेस करुन पोलिसांच्या ताब्यात देत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशी नुसार शेतकऱ्यांना त्याच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत तसेच संबंधित दोषी विद्युत कंपन्याविरुध्द व पोलिसांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात गोदावरी नदीतून तसेच कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(४६) * १७१४१ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात गोदावरी नदीतून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्यामुळे परिसरातील गावांना पुराचा धोका निर्माण झाला असून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात गेल्या अनेक वर्षापासून खाडीत बेकायदा पध्दतीने मोठे ड्रेजर, संक्शन पंप आणि ट्रॉलरचा वापर करुन रेतीउपसा केला जात असल्याने रेल्वेच्या सिग्नल यंत्रणा असलेल्या खाबांना धोका निर्माण होऊन ते पडण्याच्या स्थितीत आल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) गौण खनिजाची अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी ठाणे जिल्ह्यात गठीत करण्यात आलेल्या भरारी पथकांनी केलेल्या तपासणीत अवैध उत्खन्ननाची काही प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर रेती उपसा केल्याने रेल्वेच्या यंत्रणा असलेल्या खांबाना धोका निर्माण होवून पडण्याचे स्थितीत असल्याबाबत मध्य रेल्वेकडून आतापर्यंत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) वाळू तस्करी रोखण्यासाठी औरंगाबाद तसेच ठाणे जिल्ह्यात दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर पथकांकडून वेळोवेळी तपासणी करुन, अवैध वाळू उत्खनन प्रकरणी संबंधितांविरुध्द नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच पोलीसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दिनांक २६ जुलै, २००५ रोजी महाड (जि.रायगड) तालुक्यातील गावांवर दरड कोसळून उध्दवस्त झालेल्या शंभराहून अधिक कुटूंबांना घरे बांघण्यासाठी निधी देण्याबाबत**

**(४७) * २३६०६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दासगांव, रोहन, जुई, कोंडीवते (ता.महाड, जि.रायगड) सह विविध गावांवर दिनांक २६ जुलै, २००५ रोजी दरड कोसळून उध्वस्त झालेल्या कुटुंबाना घरे बांधण्यासाठी निधी देण्याचे शासनाने मान्य करुनही अद्याप पूर्ण निधी न दिल्याने अजनूही त्यांना सरकारी पत्राशेडमध्ये राहावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०० लाभार्थ्यांपैकी काहीनांच शासनाने पहिला टप्पा म्हणून २० हजार रुपये दिले मात्र त्यानंतर निधी दिला नसल्याने उक्त कुटुबांना घरे बांधता आली नाहीत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उध्वस्त झालेल्या कुटुंबाना घरे बांधण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

**ज्वारी पासून दारु बनविण्यासाठी उत्पादकांना शेकडो कोटी रुपयांची सबसीडी देण्यात आल्याबाबत**

**(४८) * १६४०७ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा),**

**ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ज्वारीपासुन दारु बनविण्यासाठी उभारलेल्या कारखान्यांना प्रोत्साहन देण्यासाठी वित्त व नियोजन विभागाचा विरोध डावलून ११ कारखान्यांना १३२ कोटी ८२ लाखांची सबसिडी देण्याकरिता करदात्यांच्या रुपयांचे वाटप शासनाने केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ११ कारखान्यांपैकी मे.अल्को प्लस (लातूर) ग्रेनोटेक (औरंगाबाद) विराज (सांगली) आनंद डिस्टीलरी (अमरावती), यशराज (सातारा) वेंकटेश्वरैया (सांगली) आणि शिवशक्ती (सांगली) या ७ कारखान्यांना कोणत्याही प्रकारच्या सवलतीची आवश्यकता नसताना १३२ कोटी ८२ लाखांपैकी १२० कोटी १७ लाख रुपयांची सवलत दिली असल्याने कॅगने अहवालात आक्षेप नोंदविला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही कोटीची सबसिडी घेऊन लातूरचा अल्को प्लस आणि अमरावतीची आनंद डिस्टीलरी हे दोन्ही कारखाने लगेच बंद झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गैरव्यवहारासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) तदनुसार, दोषी व्यक्तींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) राज्य मंत्रीमंडळाच्या दि.१६.०५.२००७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार मद्यार्क निर्मितीकरिता आसवनींना चालना देण्यासाठी खराब धान्याला योग्य भाव मिळवुन शेतक-यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासन निर्णय, दिनांक ८ जून, २००७ अन्वये राज्यातील उत्पादीत धान्यापासून मद्यार्क निर्मितीकरिता “धान्याधारित आसवनी व एकात्मिक घटक अर्थसहाय्य २००७” ही योजना अंमलात आणली होती. या योजनेसाठीचे विहित निकषाची पुर्तता झाल्याने वित्त विभागाच्या सहमतीने मद्यार्क निर्मिती करणा-या आसवनींना विहित दराने रु.१३२.८१ कोटी एवढे अर्थसाय्य हे महाराष्ट्र राज्यातील धान्याधारित मद्यार्कापासून निर्मिती झालेल्या मद्याच्या विक्रीतून शासनास प्राप्त झालेल्या महसुलाच्या रु. ३८५५ कोटीमधुन प्रदान करण्यात आले आहे.

या योजनेनुसार देण्यात येणारे अर्थसहाय्य योजनेत्तर (नॉन प्लॅन) तरतूदीमधून देण्यात येत असल्याने यासाठी नियोजन विभागाच्या मान्यतेची आवश्यकता राहत नाही.

(२) कॅगने त्यांच्या अहवालात ११ पैकी ७ घटक स्वबळावर आसवनीची उभारणी करण्यासाठी सक्षम असतांनादेखील एकूण रु.१३२.८१ कोटी पैकी रुपये १२०.१७ कोटी अर्थसहाय्य प्रदान केलेले असल्याचे नमूद केले आहे. तथापि सदरच्या सात घटकांनी विहीत कालमर्यादेत प्रकल्पाची उभारणी केली असल्याने या योजनेच्या निकषानुसार हे घटक अर्थसहाय्य मिळण्यास पात्र ठरतात. त्यामुळे योजनेनुसार पात्र असलेल्या सात आसवनींना रुपये १२०.१७ कोटी अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

(३) मेसर्स अल्कोप्लस प्रोड्युसर्स प्रा.लि. लातूर या घटकाची आसवनी दिनांक ३१/३/२०१३ पर्यंत कार्यरत होती. तसेच सन २०१३-१४ मध्ये दिनांक २३/११/२०१३ रोजी एक दिवस आसवनी कार्यरत होती. तद्नंतर सन २०१४-१५ व दिनांक १/४/२०१५ पासून आजतागायत आसवनी बंद आहे.

मेसर्व आनंद डिस्टीलरीज, अमरावती या घटकाची आसवनी दिनांक १८/९/२०१४ ते दिनांक २०/९/२०१४, दिनांक १३/१०/२०१४ ते २१/१०/२०१४, दिनांक ३०/१०/२०१४ ते ३०/११/२०१४, दिनांक ६/१२/२०१४ ते ११/१२/२०१५ व दिनांक १७/२/२०१५ ते १२/३/२०१५ या कालावधीमध्ये कार्यरत होती.

उपरोक्त दोन्ही आसवनींचे दिनांक ३१/३/२०१६ पर्यंत नूतणीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे घटक केव्हाही मद्यार्क उत्पादन करण्यास सक्षम आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर शहरातील शेतक-यांना प्रत्यक्ष खते न देता खते दिल्याच्या खोटया नोंदी तयार करुन शासनाच्या अनुदानाचा केलेला अपहार

**(४९) * २१९६७ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील शेतक-यांना प्रत्यक्ष खते न देता खते दिल्याच्या खोटया नोंदी तयार करुन शासनाकडून अनुदान बळकाविल्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने संबंधितांची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीअंती शेतक-यांना प्रत्यक्ष खते न देता खते दिल्याच्या खोटया नोंदी तयार करुन शासनाकडून अनुदान बळकाविलेल्या व्यक्तिंविरुध्द शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय 'आरे' डेअरी बंद करुन तेथील जमीन विकण्याचे शासन स्तरावरुन प्रयत्न होत असल्याबाबत**

**(५०) * २२८८२ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरे एनर्जी, लस्सी, मसाला दुध, ताक इ.लोकप्रिय उत्पादनांना प्रचंड मागणी असूनही मुंबईत ११ लाख लिटर दुध उत्पादन होत असणाऱ्या आरे डेअरीत, वरळी, कुर्ला व गोरेगाव येथील तीनही डेअ-यातुन केवळ ५० हजार लिटर दुधाचे उत्पादन होत असल्याने प्रशासनाच्या हलगर्जीपणांमुळे ही लोकप्रिय उत्पादने बंद करण्यात आल्याचे माहे मे २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, “आरे” उत्पादन कमी करुन मुंबईतील गोरेगाव, वरळी व कुर्ला येथील आरे डेअऱ्या बंद करुन तेथील जमिन विकण्याचे प्रयत्न शासन स्तरावरुन सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आरे डेअरीतील दुध व दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन वाढविण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई दूध योजनेअंतर्गत टोन्ड दूध, आरे स्पेशल दूध, एनर्जी, लस्सी, मसाला दूध तसेच तूप यांचे उत्पादन व वितरण नियमितपणे सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) १) बृहन्मुंबई दूध योजनेचे ऑगस्ट- २०१४ पासून दैनंदिन दुधाच्या वितरणात २० हजार पासून ५३ हजार लिटर पर्यंत वाढ करण्यात आलेली आहे.

२) आरे केंद्रांवरुन विक्री होणाऱ्या दुग्धजन्य पदार्थांचे वितरक व विक्री कमिशनमध्ये वाढ करण्यात आली आहे,

३) बृहन्मुंबई दूध योजनेअंतर्गत आरे दूध केंद्रावरुन दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री वाढविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे.

४) आरे दूधाचे विक्री दर 'वाजवी' ठेवण्यात आले असून त्याची विक्री वाढविण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिराती देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दारव्हा तालुका कृषी विभागातील कृषी विकास योजनेत**
**मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(५१) * २४५६६ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा (जि.यवतमाळ) येथील तालुका कृषी विभागामार्फत व्हि.आय.डी.पी अंतर्गतच्या ठिबक व तुषार सिंचन योजना व फळबाग योजना व फळबाग योजनेच्या अनुदान वाटपात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागातील कृषी सहाय्यक व अधिकारी योजनेचा लाभ शेतक-यांना मिळवून देत नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अंती कृषी सहाय्यक व अधिकारी यांच्यावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) नाही, योजनांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेची अंमलबजावणी करुन अनुदानाची रक्कम लाभधारकांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोकणात झालेल्या अवकाळी पावसाने व गारपीटीने**
**आंबा-काजूच्या बागा उध्वस्त झाल्याबाबत**

**(५२) * १७२१९ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय कदम (दापोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणसह राज्यात ठिकठिकाणी दिनांक ५ मे, २०१५ वा त्या सुमारास झालेल्या वळीवाच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर भातशेतीसह, आंबा, काजू, चिकू, डाळींब, केळी, कांदा व इतर पिकांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात जानेवारी, २०१५ ते एप्रिल, २०१५ अखेर झालेल्या अवेळी पावसामुळे ७१० हेक्टर वरील आंबा, काजू, नारळ, चिकू तसेच इतर पिके, भाजीपाला यांचे तसेच अनेक घरे, शासकीय इमारती यांचेवरील पत्रे उडून जाऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झाले हे ही खरे आहे काय,

(३) रायगड जिल्हयात माहे जानेवारी २०१५ ते एप्रिल २०१५ अखेर झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना अतिअल्प मदत देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने नुकसानग्रस्त भागाचे सर्वेक्षण केले आहे काय,

(५) असल्यास, नुकसानग्रस्तांना तातडीने मदत देणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे. कोकण विभागामध्ये दिनांक ५ मे, २०१५ वा त्यासुमारास वळीवाच्या पावसाने शेती पिकांचे तसेच फळपिकांचे नुकसान झालेले नाही. तथापि राज्यामध्ये अहमदनगर, सांगली, सातारा, कोल्हापूर, नंदूरबार व नांदेड या जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस व गारपीटीमूळे एकूण ९४२ हेक्टर क्षेत्र बाधीत झालेले आहे.

(२) अंशत: खरे आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यामध्ये साधारणत: फेब्रुवारीच्या अखेरीस व मार्च महिन्याच्या सुरुवातीच्या दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबा पिकांचे सुमारे ३५१ हेक्टर क्षेत्रावर ५० टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. इतर फळपिके व भाजीपाल्याचे ५० टक्केपेक्षा कमी नुकसान झालेले आहे. तसेच ३७ घरांवरील छप्परांचे नुकसान झालेले आहे.

(३), (४) व (५) रायगड जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१५ मध्ये अवकाळी पावसामुळे फळपिके वा शेतीपिकांचे नुकसान झालेले नाही. तथापि सर्व्हेक्षणाअंती फेब्रुवारी ते मार्च, २०१५ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे ५० टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेल्या बाधीत शेतक-यांना रु.१४.४४ कोटी इतका निधी दिनांक २५ मे, २०१५ रोजीच्या शासननिर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जास्त वीज दर असलेले महानिर्मितीचे विद्युत संच बंद ठेवण्याची मागणी महावितरणने विद्युत नियामक आयोगाकडे केली असल्याबाबत

**(५३) * १६२८६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानिर्मिती सध्या हायड्रो, सोलर, थर्मल व गॅसवरील वीज प्रकल्पाच्या माध्यमातून ७००० मेगावॅट वीज निर्मिती करीत असून त्याचा महानिर्मितीचा प्रति युनिटचा दर सरासरी साडेतीन रुपये तर कोळशावरील विजेचा दर चार ते सहा रुपये आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणला खाजगी वीज कंपन्यांकडून मिळणारी वीज प्रति युनिट अडीच ते सव्वातीन रुपयानी मिळत असल्याने, महावितरणने महानिर्मितीचे महागड्या विजेचे संच बंद ठेवण्याची मागणी विद्युत नियामक आयोगाकडे करुन तुलनेने कमी किमतीत मिळणारी खाजगी कंपन्याची वीज खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार वीज ग्राहकांना स्वस्तात वीज देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

महानिर्मीतीच्या विज संचातून तयार होणा-या विजेचा सरासरी दर रु. ३.५० प्रति युनिट व कोळशावरील विजेचा दर रु. ३.७७ प्रति युनिट इतका आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महावितरणकडून मेरीट ऑडर डिस्पॅच (एमओडी) तत्वानुसार महागडी वीज खरेदी कमी केली जात असून जास्तीत जास्त स्वस्त वीज घेण्यात येते. महानिर्मीतीच्या भुसावळ संच क्र.३ मधील वीजेचे दर खाजगी वीज कंपन्यांच्या तुलनेत जात असल्याने सदर संच बंद करण्याची विनंती महावितरणने दि.२०.०३.२०१५ च्या पत्रान्वये महानिर्मीतीला केली व सदर पत्राची प्रत महाराष्ट्र विघुत नियमक आयोगाला सादर केली. त्याचवेळी महावितरणे बाजारात उपलब्ध असलेली स्वस्त वीज स्पर्धात्मक निविदेद्वारे खरेदी केली व सदर संच दि.२०.०४.२०१५ पासून बंद करण्यात आला.

(३) व (४) महानिर्मीती कंपनीने कोळश्याबाबत अवलंबिलेल्या नवीन धोरणानुसार भुसावळ संच क्र.३ चे वीजेचे दर रु. ३.३४ प्रति युनिट वरुन रु. ३.०५ प्रति युनिट पर्यन्त कमी होत असल्याचे महावितरणला कळविल्यामुळे महावितरणने सदर कमी दर गृहित धरुन मेरीट ऑडर डिस्पॅच तत्वानुसार भुसावळ संच क्र.३ मधून वीज घेण्यात येत असल्याचे राज्य भार प्रेषण केंद्रास कळविले आहे. सदर भुसावळ संच क्र.३ दिनांक १२.०६.२०१५ पासून पुन्हा सुरु करण्यात आला आहे. अशाप्रकारे विज ग्राहकांना स्वस्तात स्वस्त वीज देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

-----------------

**खोपोली (जि.रायगड) तसेच चिंचवाड (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथे कृष्णा नदी पात्रालगत विकास कामाच्या नावाखाली अवैधरित्या डोंगर मातीचे उत्खनन होत असल्याबाबत**

**(५४) * २०९६५ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुब्रा-कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधुत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी):** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) येथे विकास कामाच्या नावाखाली डोंगर मातीचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याने पावसाळयात येणाऱ्या पुराच्या पाण्यामुळे धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चिंचवाड (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथे कृष्णा नदी पात्रालगत जेसीबीद्वारे बेकायदेशीर लाल मातीचे उत्खनन केले जात असून कोटयवधी रुपयांचा शासनाचा महसूल बुडत असल्याने तातडीने पंचनामे करुन तस्करांवर दंडात्मक स्वरुपाची कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांनी एका निवेदनाद्वारे दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास तहसिलदारांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध उत्खननाबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे अवैधरित्या उत्खनन करुन कोटयवधी रुपायांचा महसूल बुडविणाऱ्या तस्करावर कोणती कारवाई केली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** : (१) खोपोली नगरपरिषदेने त्यांच्या मालकीच्या मौजे भानवज (खोपोली), ता.खालापूर येथील स.न. ५८/२ व ५८/३ येथे पाण्याच्या टाकीच्या बांधकामासाठी विनापरवाना ११,२३६ ब्रास मातीचे उत्खनन केले आहे. मात्र, पाताळगंगा नदीच्या क्षेत्रापासून अंदजो १ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावरील टेकडीवर नगरपरिषदेने सदर उत्खनन केले असल्यामुळे पुराचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) मौजे चिंचवड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथील ग्रामस्थांनी दिनांक १९.५.२०१५ रोजी निवेदन दिले, हे खरे आहे.

(३) व (४) (अ) विनापरवाना उत्खननाबाबत खोपोली नगरपरिषदेविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(ब) मौजे चिंचवड, ता.शिरोळ येथील अनधिकृत माती उत्खननाचे काम तात्काळ थांबवून, संबंधित व्यक्तींविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिंदखेडा (जि.धुळे) अमळनेर व पाचोरा (जि.जळगांव) येथील नदीपात्रातून अवैधरित्या वाळु तस्करी होत असल्याबाबत

**(५५) * १६४६४ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.के. पाडवी (अक्कलकुवा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील शिंदखेडा तालुक्यातील सुलवाडे शिवाराच्या हद्दीत वाळू ठेका देण्यात आला असून त्याची हद्द निश्चित ठरविली नसल्याने अक्कडसे गावाच्या हद्दीत वाळू उपसा होत आहे. या परिसरातील विहीरींची पातळी खालावत असून या संदर्भात ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अमळनेर (जि.जळगांव) नदीपात्रातून अवैधरित्या वाळू तस्करी होत असल्याने जिल्ह्यातील रस्ते खराब होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पाचोरा (जि.जळगांव) तालूक्यातील वाळू ठेके तात्पुरते बंद केल्याने अवैध वाळूची वाहतूक मोठया प्रमाणात होत असून दिनांक २० मे, २०१५ रोजी पाच ट्रॅक्टर महसूल विभागाने जप्त केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशी नुसार वाळू उपसा व तस्करी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) ग्रामपंचायत अक्कडसे, ता.शिंदखेडा यांनी दि.५.५.२०१५ रोजी जिल्हाधिकारी धुळे यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे.

(२) अमळनेर तालुक्यात वाळूच्या अवैध वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत. तसेच खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येत आहे.

(३) पाचोरा तालुक्यातील ३ ठेके तात्पुरते बंद करण्यात आले होते. तसेच अवैध वाळू वाहतूकीची ५ ट्रॅक्टर पकडण्यात आली आहेत.

(४) व (५) (अ) ग्रामपंचायत अक्कडसे यांच्या दि.५.५.२०१५ च्या निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत मौजे सुलवाडे, ता.शिंदखेडा या वाळूगटाच्या लिलावधारकाने त्यांच्या वाळू गटाच्या हद्दीबाहेर अक्कडसे शिवारातून वाळू उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार लिलावधारक यांच्याकडून वाळू ठेका रद्द का करण्यात येऊ नये याबाबत नोटीस देऊन, खुलासा मागविण्यात आला आहे.

(ब) अंमळनेर तालुक्यात माहे जानेवारी २०१५ ते जून २०१५ या कालावधीत वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या ७४ वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून दंडापोटी रु.९,७६,५००/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच वाहतूकीमुळे खराब झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीची काही कामे पूर्ण झाली असून, काही प्रगतीपथावर आहेत.

(क) पाचोरा तालुक्यातील ३ वाळू ठेके दि१६.४.२०१५ ते दि.२०.५.२०१५ या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आले होते. या कालावधीत तालुका स्तरावरील भरारी पथकामार्फत वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या ५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, उप प्रादेशिक परिवहन विभागाकडून सदर वाहनांचे परवाने ६० दिवसांकरिता निलंबित करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**श्री कापरीदेव मच्छिमार सहकारी संस्था मर्यादित, सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) या संस्थेने लाकडी बोटी ऐवजी फायबर बोटी बांधून ३० लाखांचा अपहार केल्याबाबत**

**(५६) * २१७३५ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री कापरीदेव मच्छिमार सहकारी संस्था मर्यादित, सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) या संस्थेला राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) मार्फत लाकडी बोटी बांधण्यासाठी कर्ज मंजूर झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेने लाकडी बोटी ऐवजी फायबर बोटी बांधून प्रत्येक बोटीमागे रु.३ लाख ८१ हजार प्रमाणे सुमारे रु.३० लाखांचा अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने संबंधित तत्कालीन चेअरमन व संचालक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याबाबत आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांना आदेश दिले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आदेशानुसार संबंधित संस्थेच्या संबंधित तत्कालीन चेअरमन व संचालक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यानुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही हे खरे नाही. तथापि सासवणे मांडवा विभाग मच्छिमार सहकारी संस्था मर्या, सासवणे ता.अलिबाग, जि.रायगड या संस्थेस सन २००८-०९ मध्ये अर्थसहाय्य मंजूर झाले होते. सदर अर्थसहाय्य फेब्रुवारी, २०११ मध्ये श्री.कापरीदेव मच्छिमार सहकारी संस्था मर्या., सासवणे ता.अलिबाग, जि.रायगड या संस्थेकडे वर्ग करण्यात आले.

(२) हे खरे आहे. प्रत्यक्षात रु.६०.३९ लाख इतक्या रक्कमेचे अतिरिक्त प्रदान झालेले आहे.

(३) होय.

(४) होय.

(५) अद्यापी सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ताडदेव (मुंबई) येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात दलालांनी खोटी कागदपत्रे सादर करुन गैरव्यवहार केला असल्याबाबत**

**(५७) * २२५३४ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडदेव (मुंबई) येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात दलालांनी खोटी कागदपत्रे सादर करुन कायमस्वरुपी परवाना मिळविण्याचे गैरप्रकार समोर आल्याचे दिनांक २५ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ताडदेव पोलीस स्टेशनात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सॉफ्टवेअरच्या मदतीने कांही दलालांनी बनावट कागदपत्रे सादर करुन कायमस्वरुपी चालक परवाना बनवण्याचा प्रकार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, बनावट कागदपत्रे सादर करणा-या दलालांवर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) (२) व (३) होय.
(४) यासंदर्भात, पोलीस स्टेशन, ताडदेव, मुंबई येथे दि.१४.०५.२०१५ रोजी गुन्हा नोंद क्रमांक १४२/१५, कलम ४२०,४६५,४६७,४६८,७१ व ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणातील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्रीगोंदा तालुक्यातील (जि.अहमदनगर) घोड धरणासाठी संपादित केलेली जमिन तलाठी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी परस्पर विकल्याबाबत**

**(५८) * १८८५८ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा-कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुक्यातील (जि.अहमदनगर) घोड धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीची तलाठी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी परस्पर विक्री केल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतक-यांच्या जमिनीचे संपादन केले त्याचे पुनर्वसन अद्याप करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार तलाठी व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौजे माठ मौजे वडगांव-शिदोंडी आणि मौजे म्हसे ता.श्रीगोंदा येथील घोड धरणासाठी संपादित केलेल्या क्षेत्राचे कमी जास्त पत्रक न झाल्याने सदर संपादित क्षेत्र मूळ मालकाच्या नावे राहिल्यामुळे काही प्रकरणी मूळ मालकांनी क्षेत्राची खरेदी-विक्री व वाटपाद्वारे हस्तांतरण केल्याचे दिसून येते. त्यानुसार फेरफार नोंदी घेऊन ७/१२ वर नोंदी घेतल्याचे आढळून आल्याने तत्कालीन तलाठी आणि मंडळ अधिकारी त्यास सकृतदर्शनी जबाबदार असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) घोड प्रकल्पांमध्ये पूर्णत: बाधित ४ गावे तसेच अंशत: बाधित २ गावे असून सदर गांवाचे पुनर्वसन झाले आहे. त्यातील मौजे वडगांव-शिंदोडी या गावातील राखीव वनक्षेत्रात ग्रामस्थांनी घरे बांधली आहेत. पुनर्वसनासाठी आवश्यक अशा जमिनीचे निर्वणीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २, श्रीगोंदा यांच्याकडून सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) मौजे माठ, म्हसे व वडगांव-शिंदोडी ता.श्रीगोंदा या गावांत संपादित झालेल्या जमिनीची विक्री झाल्याप्रकरणी तहसीलदार, श्रीगोंदा यांनी चौकशी अहवाल उप विभागीय अधिकारी, श्रीगोंदा-पारनेर भाग यांना सादर केला असून त्यांच्यास्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लातूर जिल्हयात कृषी विभागामार्फत राबविण्यात आलेल्या योजनांमध्ये कोट्यवधीचा अपहार झाला असल्याबाबत**

**(५९) * २३७५८ श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयात कृषी विभागामार्फत राबविण्यात आलेल्या योजनांमध्ये कोट्यवधीचा अपहार झाला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१२ ते २६ मार्च, २०१५ या कालावधीत उदगीर तालुक्यात कृषी विभागामार्फत राबवल्या जाणा-या एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन योजनेतील ४,६७,८८,१३१ रुपये रोखीने उचलेले गेल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी तातडीने चौकशी करावी अशा प्रकारचा आदेश मा.मुख्यमंत्री महोद्यांनी दिला असून याप्रकरणी चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती कृषी विभागामार्फत राबविण्यात आलेल्या योजनांमध्ये कोट्यवधीचा अपहार करणा-या व्यक्तींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) नाही. तथापि, लातूर जिल्हयातील लातूर, अहमदपूर, देवणी, जळकोट व रेणापूर तालूक्यांतील गतिमान पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(३) व (४) मृदसंधारण व जलसंधारण योजनांमध्ये भ्रष्टाचार व भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सूचना मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक २०.४.२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे केल्या आहेत. याप्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी चौकशीचे आदेश दिले असून त्याबाबत चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुलुंड पूर्व, मुंबई येथील सीएट कंपनीला दिलेला भूखंड विकासकाला दिल्याबाबत

**(६०) * २००५९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने १९५८ मध्ये मुलुंड पूर्व, मुंबई येथील सुमारे ३० एकर भूखंड संपादित करुन सीएट कंपनीला कारखाना उभारण्यासाठी दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भूखंडापैकी ७ एकर भूखंडाचा वापर कारखान्यासाठी होत नसल्याने मे.ॲशफोर्ड इन्फोटेक प्रा.लि. या विकासकाला विकल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा भूखंड विकासकाला विकल्यानंतर त्यावर पुर्नविकासाला परवानगी देताना उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने पुनर्विकास अधिमूल्य व वापरातील बदल यावरील शुल्क न आकारता पुनर्विकासाला परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अधिमूल्यांची रक्कम वसूल करण्याबाबत व दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सीएट कंपनीस शासनाने मौजे भांडूप येथील जमीन दि.१५/१०/१९५८ व दि.१७/०१/१९६९ रोजी कंपनीबरोबर सनदेद्वारे भूसंपादन करुन उपलब्ध करुन दिली आहे.

(२) सदर प्रकरणी भुसंपादन अधिनियम, १८९४ मधील तरतुदीनुसार सनद निष्पादित करुन तसेच अटी/शर्तीच्या अधिन राहून संपादित करण्यात आलेल्या एकूण क्षेत्रापैकी २८०१०.४४ चौ.मी. क्षेत्राचा जमिनीचा वापरात बदल करुन रहिवास व वाणिज्य प्रयोजनासाठी विक्री करण्याबाबत शासन ज्ञापन क्र.एलटीएच-०७/२००९/प्र.क्र..८८/अ-२, दि.१८.०९/२०१० अन्वये सदर क्षेत्राची विक्री करणेसाठी परवानगी दिली आहे.

(३) उक्त नमूद ज्ञापन दि.१८.०९.२०१० मधील अट क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांचे दि. ४.०३.२०११ रोजीच्या आदेशान्वये कंपनीकडून २६९४३.४४ चौ.मी. एवढ्या क्षेत्रात मूल्यांकनाच्या ५०% अनर्जित उत्पन्न ६१.५६ कोटी रुपये सरकार जमा करुन घेवून विक्री करण्यास परवानगी दिली आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्ह्यातील भिमा नदी काठावर कृषी पंपाची वीज दररोज प्रदीर्घ काळ बंद ठेवण्यात येत असल्याबाबत**

**(६१) * १६६७५ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर व दक्षिण कोल्हापूर तालुक्यातील भीमा नदीकाठावरील शेतक-यांचे कृषी पंपाची वीज महावितरण बंद ठेवून शेतक-यांची पिळवणूक करीत असून भीमा नदीच्या दुस-या नदीकाठावर कर्नाटकचे शेतकरी मात्र २४ तास नदीतील पाण्याचा बेसुमार उपसा करत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्राच्या नदीकाठच्या कृषी पंपाची महावितरणने वीज बंद ठेवल्याने शेतातील उभी पिके पाण्याविना करपून जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शेतक-यांचे कोट्यावधी रुपयाचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे. जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या आदेशानुसार भीमा नदी काठावरील औज व चिंचपुर बंधा-यावरील कृषीपंपाचा वीज पुरवठा दिनांक १८.३.२०१५ पासून पुर्णपणे बंद केलेला आहे.

दक्षिण कोल्हापूर हा भाग कागल तालुक्यात आहे. कागल तालुक्यालगत दुधगंगा नदी वाहते, दुधगंगा नदीच्या कोल्हापूर जिल्ह्यातील पात्रालगत शेतक-यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेनुसार दिनांक १४.१.२०१३ च्या परिपत्रकानुसार दिवसा ८ तास व रात्री १० तास थ्री फेज वीज पुरवठा केला जातो.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) जिल्हाधिकार, सोलापूर यांच्या आदेशानुसार भीमा नदी काठावरील औज व चिंचपुर बंधा-यावरील कृषींपपाचा वीज पुरवठा दिनांक १८.३.२०१५ पासून पुर्णपणे बंद करण्यात आला होता. सदर परिसरातील जनावरांना पिण्याकरीता पाणी उपलब्ध व्हावे म्हणून दिनांक ३.५.२०१५ पासून वरील वाहिन्यांवरील वीज पुरवठा दिवसा २

तासाकरिता चालू करण्यात आला होता. तथापि, जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या दिनांक २१.५.२०१५ च्या पत्रान्वये सदर वाहिन्यांवरील वीज पुरवठा पुर्णपणे बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

भीमा नदी ही कोल्हापूर जिल्ह्याशी संबंधित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळाने विद्युत वितरणासाठी नियुक्त केलेली टोरंटो कंपनी मनमानी कारभार करित असल्याबाबत**

**(६२) * २०७०५ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळाने विद्युत वितरणासाठी टोरंटो पॉवर कंपनीची नियुक्ती केली असून सदर नियुक्ती विज अधिनियम २००३ च्या कायद्यानुसार नसून सदर कंपनीला कंत्राट देताना ग्राहकांकडील विद्युत देयकांचा तपशील अयोग्य व बनावट रितीने तयार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांकडून दंड वसुल करण्याचे टोरंटो कंपनीला दिलेले अधिकार सन २००३ च्या वीज अधिनियमाच्या कलम १२६ ते १३५ अन्वये अधिनियमाचा भंग करणारे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत टोरंटो कंपनीने भारनियमनाबाबत शासनाचे निकष न पाळणे, वीज ग्राहकांवर दक्षता पथकाकडून खोट्या केसेस केल्या जाणे व इतर अनेक तक्रारी याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी मा. ऊर्जा मंत्री व प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांच्याकडे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) होय.

(४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा.मंत्री (ऊर्जा) यांनी दिनांक १.४.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत संबंधितांना दिशा निर्देश दिलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कर्जत-भिवपूरी (जि.रायगड) येथील भिवपूरी टाटा पॉवर हाऊस कंपनीतील कर्मचा-यांना कोणतीही पूर्वसूचना न देता कामावरुन कमी केल्याबाबत**

**(६३) * १७५१६ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत-भिवपूरी (जि.रायगड) येथील विजनिर्मिती करणारी भिवपूरी टाटा पॉवर हाऊस कंपनीत काम करणा-या ३०० पेक्षा अधिक कर्मचा-यांना कोणतीही पूर्वसूचना न देता कामावरुन कमी करण्यात आल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने हस्तक्षेप करुन या हंगामी कामगारांना पुन्हा कामावर रुजू करुन घेण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही. तथापि सुमारे १८ वर्षापूर्वी प्राजेक्टमध्ये काम करणाऱ्या विवादातील कामगारांच्या प्रतिनिधींनी १६/०४/२०१५ ते २०/०४/२०१५ या कालावधीत कामगारांचा हिशोब किंवा मोबदला दिला नाही या मागणीसाठी धरणे आंदोलन केले होते.

(२) प्रस्तुत विवादामध्ये शासनाचा विविध स्तरावर वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या होत्या. सदर बैठकांमध्ये विवादीत कामगारांना त्यांची कायदेशीर देय रक्कम देण्यात आली असल्याचे व्यवस्थापनाने नमूद केले आहे. याच विवादातील कामगारांच्या प्रश्नाबाबत मा.मंत्री महोदय (कामगार) यांचेकडे दि.१७/०६/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. धरणे आंदोलनाच्या अनुषंगाने या कार्यालयातही बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावंतवाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) तीन गावात सातबारा उता-यावरील वहिवाटदरांची नावे वगळून सदर जमिनी शासनाच्या नावे करण्यात आल्याबाबत

**(६४) * १६८७४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्याच्या आंबोली, चौकुल आणि गेळे या तीन गावात गेली १२० वर्षे पिढ्यानपिढ्या कसत असलेल्या २५०० शेतक-यांची ३८ हजार एकर जमिनीच्या सातबारा उता-यावरील वहिवाटदरांची नावे वगळून सदर जमिनी शासनाच्या नावे करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटनासाठी विकसित करण्याच्या निमिताने शासनाने ताब्यात घेतलेल्या सदर जमिनी प्रत्यक्षात बड्या खाण कंपन्याना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील मौजे आंबोली, चौकुळ व गेळे या गावामधील कबुलायतदार गावकर म्हणून नोंद असलेल्या जमिनीच्या महसूल अभिलेख्यामधील कबुलायत गावकर म्हणून झालेल्या नोंदी काढून त्या जमिनी शासन जमा करण्यात याव्यात आणि तदनंतर सदर जमिनीवरील प्रत्यक्ष वहिवाटीसंदर्भात नव्याने चौकशी करून ज्या व्यक्तीची प्रत्यक्ष वहिवाट निष्पन्न होईल अशा व्यक्तींना त्यांच्या वहिवाटीखालील जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१ मधील तरतुदीनुसार भोगवटामुल्य न आकारता जमिनीच्या शेतसाऱ्याच्या २०० पट रक्कम आकारुन वाटप करण्यात याव्यात असा निर्णय शासन ज्ञापन दि.१०/५/१९९९ अन्वये व शुध्दीपत्रक दि.१२/६/२००० अन्वये घेण्यात आला असून पात्र व्यक्तींना वरीलप्रमाणे जमीन वाटप केल्यानतर शिल्लक जमिनीचे सर्व्हेक्षण करुन ज्या जमिनी पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यास योग्य आढळून येतील त्या पर्यटन विभागास हस्तांतरित करण्यात याव्यात व उर्वरित जमिनीचे सर्व्हेक्षण करुन ज्या जमिनी पर्यायी वनीकरणासाठी व संरक्षण व व्यवस्थापनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील त्या जमिनी लँड बँकेमध्ये समाविष्ट करण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे.

(२) नाही.

(३) (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खाजगी व्यक्ती आणि संस्थांना दिलेल्या वक्फ बोर्डाच्या जमिनी परत घेण्याबाबत**

**(६५) * १८१७४ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) : तारांकित प्रश्न क्रमांक १८४० ला दिनांक ५ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वक्फ बोर्डाच्या मालकीच्या लाखो रूपयाच्या अत्यंत कमी किंमतीमध्ये खाजगी व्यक्ती वा संस्थांना दिलेल्या जमिनी त्यांच्याकडून काढून घेऊन त्या पुन्हा वक्फ बोर्डाकडे देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनींपैकी खाजगी व्यक्ती वा संस्थां यांचेकडे किती हेक्टर जमिनी आहेत.

(३) उक्त संस्थांना दिलेल्या जमिनींपैकी आतापर्यंत किती हेक्टर जमिनी संबंधितांकडून काढून घेण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले,

(५) तसेच संस्थांना दिलेल्या जमिनी संबंधितांकडून काढून घेऊन त्या पुन्हा वक्फ बोर्डाकडे देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय. वक्फ मालमत्तेशी संबंधित ज्या प्रकरणांमध्ये बेकायदेशीर व्यवहार झाले आहेत अशा सर्व प्रकरणांमधील संबंधित वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश दिलेले आहेत. अशा प्रकारची कार्यवाही करतांना अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवण्याची शक्यता आहे. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली तीन वर्षासाठी एक उपजिल्हाधिकारी, दोन तहसीलदार आणि दोन नायब-तहसिलदार यांचा समावेश असलेल्या एक कृतीदल (Task Force) स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(२) वक्फ मंडळाची किती हेक्टर जमीन खाजगी व्यक्ती व संस्थांकडे आहे याबद्दल कोणतेही सर्वेक्षण झालेले नाही. तथापि, वक्फ बोर्डाच्या मालकीच्या खाजगी व्यक्तींकडे अनधिकृत असलेल्या ३२३ भुखंड व ११० संस्थाविरुध्द वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५४ अन्वये वक्फ मंडळाकडे सुनावणी प्रलंबित असल्याचे वक्फ मंडळाच्या अहवालात नमूद केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केंद्र व राज्य शासनाचा परवाना नसतांना ॲग्रो हायटेक कंपनी सातपूर, नाशिक या नावाने बोगस किटकनाशके व खताची सर्रास विक्री होत असल्याबाबत**

**(६६) * २३१३६ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोरण (ता.सटाणा, जि.नाशिक) या गावी केंद्र व राज्य शासनाचा परवाना नसतांना ॲग्रो हायटेक कंपनी सातपूर, नाशिक या नावाने बनावट किटकनाशके व खताची विक्री करुन शेतक-यांना फसविणा-या कंपनीवर राज्याच्या गुणवता निरीक्षक विभागाने दिनांक २२ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास छापा टाकला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार संबंधित ॲग्रो हायटेक कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे. दि.१६/५/२०१५ रोजी छापा टाकला आहे.

(२) होय.

(३) खत नियंत्रण आदेश १९८५ व किटकनाशक अधिनियम १९६८ मधील तरतूदींचे उल्लंघन करुन रसायनिक खताचा “उत्पादन परवाना” व “विक्री परवान” न घेता सुक्ष्म मुलद्रव्ययुक्त खताची व केंद्र शासनाच्या परवानगी शिवाय, जैविक कीटकनाशके तयार करुन, त्यांची विक्री केली जात असल्याचे आढळून आल्याने, ४ आरोपीविरुध्द दि.२१ मे, २०१५ रोजी गु.रं.नं.१३३ नुसार सटाणा पोलीस स्टेशन (जि.नाशिक) येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलिसांनी या संदर्भात ४ आरोपींना अटक केलेली आहे. गुन्हयाचा तपास चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत ठिंबक सिंचन संचासाठी शेतक-यांना देण्यात येणारे अनुदान अद्‌याप वितरीत केले नसल्याबाबत**

**(६७) * १६४१० डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.राहुल कुल (दौंड), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत ठिंबक सिंचन संचासाठी शेतक-यांना देण्यात येणारे २०१३-१४ वर्षाचे राज्यभरातील सुमारे साडेतीनशे कोटींचे अनुदान अद्‌याप वितरीत केले नसल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांचे सन २०१४-१५ चे अनुदान वाटप करत असल्याने सन २०१३-१४ या वर्षातील अनुदान पात्र शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१३-१४ या वर्षातील ठिबक सिंचन संचासाठीचे अनुदान त्वरीत वाटप करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) सन २०१४-१५ या वर्षासाठी केंद्र शासनाकडून सुक्ष्म सिंचनासाठी शेतावरील पाणी व्यवस्थापन उप-अभियानांतर्गत प्राप्त झालेले अनुदान त्या वर्षातील प्रस्तावांसाठीच वापरण्याचे केंद्र शासनाचे निर्देश असल्याने सन २०१४-१५ चे अनुदान देण्यात आले.

सन २०१३-१४ या वर्षासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान सन २०१२-१३ मधील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी वापरण्यात आले. त्यामुळे सन २०१३-१४ या वर्षासाठी अनुदान शिल्लक राहीले नाही. परिणामी सन २०१३-१४ या वर्षात शेकऱ्यांकडून प्रस्ताव स्विकारण्यात आले नाहीत. तथापि, शेतक-यांचे हित लक्षात घेवून सन २०१३-१४ या वर्षात ज्या शेतक-यांनी सुक्ष्म सिंचन संच बसविले आहेत त्यांचे प्रस्ताव स्विकारुन त्यांना अनुदान देण्याचा निर्णय शासनाने डिसेंबर, २०१४ मध्ये घेतला आहे. त्यानुसार सुमारे रु.३६० कोटी एवढ्या रक्कमेचे प्रस्ताव शेतक-यांकडून प्राप्त झाले आहेत.

सन २०१३-१४ मधील प्रस्ताव नाबार्डकडून घेण्यात आलेल्या कर्जाची रक्कम रु.३२६.७३ कोटी मधून निकाली काढण्यात येणार आहेत. त्यासाठी सन २०१५-१६ मध्ये रु.३३० कोटी एवढ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी रु. २३१ कोटी निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधीचे वाटप क्षेत्रिय स्तरावर करण्यात आले आहे. शेतक-यांना अनुदान वाटपाची कार्यवाही तातडीने करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करवीर तालुक्यामध्ये (जि.कोल्हापूर) तसेच तामसवाडी (ता.पारशिवनी, जि.नागपूर) शिवारातून वीट व्यवसायासाठी कच्चा माल म्हणून उत्खनन होत असल्याने नदी काठ उध्दवस्त होत असल्याबाबत**

**(६८) * २१९७४ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवीर तालुक्यामध्ये (जि.कोल्हापूर) कुंभी, भोगावती, तुळशी व पंचगंगा नदी काठी वीट व्यवसायासाठी कच्चा माल म्हणून उत्खनन होत असून त्याकडे महसूल विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे नदी काठ उध्दवस्त होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, तामसवाडी (ता.पारशिवनी, जि.नागपूर) शिवारातून वाहणाऱ्या कन्हान नदीच्या काठावर काही विटभट्टी मालकांनी मोठया प्रमाणात खोदकाम केल्याचे माहे एप्रिल-मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.२९ एप्रिल, २०१५ रोजी "पंचगंगा काठावर वाळूमिश्रित मातीचा उपसा" अशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झालेले आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) (अ) प्रश्न भाग १ च्या उत्तरात नमूद दै.पुढारी या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता, करवीर तालुक्यातील मौजे आंबेवाडी येथे ५०० ब्रास मातीचे अनधिकृत उत्खनन झाल्याचे आढळून आले. त्यानुसार संबंधिताविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(ब) मौजे तामसवाडी येथील कन्हान नदीच्या काठावरील सर्व्हे क्र. ३४८ व ३५०/१ या खाजगी जमिनीतील विटभट्टयाकरिता माती वापरासाठी उप विभागीय अधिकारी, रामटेक यांनी परवानगी दिली आहे. त्यानुसार मौजे सिंगोरी व दहेगाव (जोशी) येथून

माती आणून विटा तयार करण्यात येत आहेत. संबंधित विटभट्टीधारकांनी कन्हान नदीच्या काठावर कोणतेही खोदकाम केल्याचे आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात विशेषत: मराठवाड्यात माहे एप्रिल मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे ७ व्यक्तींचा झालेला मृत्यु**

**(६९) * १७२२० श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के. पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मराठवाड्यात दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या जोरदार पाऊस व गारपीटीने ७ जणांचा मृत्यू झाला असून भाजीपाल्यासह पिकांचे मोठे नुकसान झाले, नाशिकमधील मालेगाव, निफाड, सिन्नर, सटाणा, देवळा, इगतपूरी, त्र्यंबकेश्वर तालुक्यात काही भागात गारपीट होऊन द्राक्ष बाग, कांदा, गहू, डाळिंब, टॉमॅटो, शेतपीक अशा सर्व पिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा, विदर्भातील नागपूरसह, अकोला, अमरावती, बुलढाणा येथे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंदखेड तालुक्यात व लोणार तालुक्यात वादळी वा-यासह मुसळधार पावसाने पिकांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(५) असल्यास, पाहणीच्या अनुषंगाने शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) होय, ह खरे आहे.

(५) व (६) माहे एप्रिल, २०१५ मध्ये झालेल्या अवेळी पाऊस व गारपीटीमूळे मराठवाड्यामध्ये मृत्यु पावलेल्या ७ व्यक्तिंच्या वारसांना नियमानुसार अनुज्ञेय मदत देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अवेळी पाऊस व गारपिटीमुळे एकूण २२ जिल्ह्यातील कृषि क्षेत्र बाधीत झालेले असून तेथील पंचनाम्यांची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

-----------------

### नगर जिल्ह्यात साडे चार हजार शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत

**(७०) * १६२८७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर जिल्ह्यात पाण्याअभावी पिके होरपळत असताना, शेतक-यांनी पाण्यासाठी कुपननलिका विहीरी खोदल्या असून पिकांना पाणी देण्यासाठी चार हजार ५७२ शेतक-यांनी जिल्ह्याच्या महावितरण मंडळाकडे पैसे भरले असतानाही अद्याप वीज जोडणी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) चौकशीत काय आढळून आले त्यानुसार शेतक-यांना वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे. नगर जिल्ह्यातील कृशी पंपाच्या चार हजार ५७२ प्रलंबित विद्युत जोडण्या पायाभूत आराखडा-२ या योजनेतंर्गत समाविष्ट केलेल्या असून त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### श्रीगोंदा (जि.अहमदनगर) व खेड (जि.पुणे) तालुक्यात अवैध गौण उत्खनन प्रकरणी संबंधितांकडून दंड वसुल करण्याबाबत

**(७१) * १८८७६ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोसेगव्हाण (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे शासकीय जमिनीतून बेकायदा मुरुम उत्खनन केल्याप्रकरणी श्रीराम मॅन्यूफॅक्चरिंग कंपनीला तेथील तहसिलदारांनी सुमारे ८४ लाख रुपयांच्या दंडाची नोटीस माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान बजाविली आहे, हे खरे आहे काय,

(२) राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) येथील इनरकॉन इंडिया लि.या कपंनीने पवनचक्या उभारतांना मौजे वांद्रा, वेल्हावळे, वाहागाव व कुडे बु. या गावातून ३५००० ब्रास माती, मुरुम व डबराचे अनधिकृत उत्खनन केले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तहसीलदार, खेड, जि.पुणे यांनी सदर कंपनीने अनधिकृतपणे उत्खनन केलेल्या मरुम, माती व डबराची ३५००० ब्रासची रॉयल्टीची रक्कम प्रती ब्रास २००/- रुपये या प्रमाणे ७०,००,०००/- व चालु बाजार भावाच्या प्रती ब्रास ५००/- रुपये याप्रमाणे तीन पट दंडाची रक्कम ५,२५,००,०००/- असे एकुण रक्कम रुपये ५,९५,००,०००/- असे व्यवस्थापक इनकरकॉल इंडिया लि., पुणे-५ यांनी १५ दिवसाच्या आत जमा करावेत अशी नोटीस दि. २७/१२/२०११ रोजी पाठविली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी संबंधित कंपन्यांनी दंडाची रक्कम शासनाकडे भरणा केली आहे काय,

(५) नसल्यास, त्यानुषंगाने कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्रश्नाधीन प्रकरणी रुपये ८४,७०,४००/- एवढ्या रकमेच्या दंडाच्या वसूलीची नोटीस तहसीलदार श्रीगोंदा यांच्याकडून बजाविण्यात आली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५)

(अ) दंडात्मक रक्कम वसूलीसाठी श्रीराम मॅन्युफॅक्चरिंग कंपनीला नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तथापि, श्रीराम मॅन्यूफॅक्चरिंग कंपनीने सदर दंडाची रक्कम वसुल करु नये अथवा कंपनीवर कोणत्याही प्रकारची कारवाई करु नये याबाबत मा.दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर श्रीगोंदा यांचेकडे दावा दाखल केला असून, सदर दाव्यामध्ये मा.दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर यांनी “Status Quo” (जैसे थे) परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश दिले आहेत.

(ब) इनरकॉन इंडिया लि. या कंपनीकडून दंडाची रक्कम जमीन महसूलीची थकबाकी म्हणून वसूल करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भूमाफिया आणि खदान मालकांमुळे कोणसई (ता.वाडा, जि.पालघर) येथील बंधाऱ्याचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत**

**(७२) * २००६४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूमाफियांनी आणि खदान मालकांनी बंधाऱ्यालगतच्या नदीपात्रात विनापरवाना भुसुरुंगाचे स्फोट करुन दगड पाडण्याचे काम सुरु केल्याने वाडा तालुक्यातील कोणसई येथील बंधा-याचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूमाफिया आणि खदान मालकांकडून बंधाऱ्यालगत खाली नदीपात्रात विना परवाना भूसुरुंगाचे स्फोट केले जात असल्याने त्याचेवर त्वरित कारवाई करण्याची मागणी कोणसई ग्रामपंचायतीने तहसिलदार वाडा, जिल्हाधिकारी, पालघर, मा.महसूल मंत्री यांचेकडे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यासुमारास लेखी तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदा भुसुरुंगाला आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) यासंदर्भात कोणसई ग्रामपंचायतीने तहसिलदार, वाडा यांचेकडे दि.४.१२.२०१४ रोजी निवेदन दिले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली असता, कोणसई गावाच्या हद्दीतील नदीपात्रातून विनापरवाना दगडाचे उत्खनन केल्याचे आढळून आले आहे. त्यानुसार पोलीस स्टेशन, वाडा येथे अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तथापि, कोणसई येथील कोकण पध्दतीच्या बंधाऱ्यास कोणत्याही प्रकारची हानी पोहचल्याचे निदर्शनास आले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माढा, मंगळवेढा व मोहोळ (जि.सोलापूर) या तालुक्यातील गावठाणांमध्ये स्थानिक नागरिकांनी अतिक्रमणे करून जागा व जमिनी बळकावल्याबाबत**

**(७३) * १६६७६ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा, मंगळवेढा व मोहोळ या तालुक्यातील (जि.सोलापूर) प्रकल्पग्रस्तांना जमीन देऊन त्यांचे पुनर्वसन केलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या वसाहतींपैकी बहुतांश प्रकल्पग्रस्त गावठाणांची दुरवस्था झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनेक गावठाणांमध्ये स्थानिक नागरिकांनी अतिक्रमण करून जागा व जमिनी बळकावून, धरणग्रस्तांना त्रास देऊन जमिनी विकण्यास भाग पाडले जाते किंवा त्यांना हाकलून दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील बेस्टच्या प्रतिष्ठीत वीज ग्राहकांनी ५० कोटी रुपये विज बिलाची रक्कम थकविल्या बाबत**

**(७४) * १६८७५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.शरददादा सोनवणे**

**(जुन्नर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील मुंबई पोलीस आयुक्तालय अंदाजे १.८० कोटी, शहर दिवाणी न्यायालयाचे रजिस्ट्रार यांचे १.३७ कोटी, विद्युत विभाग कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाचे २.०८ कोटी तसेच कोर्ट, जिल्हाधिकारी कार्यालयांनी यांनी मिळून मुंबई शहरात वीज पुरवठा करणाऱ्या बेस्टचे विजेच्या बीलाचे ५० कोटी रूपये थकविले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोनशे-तीनशे रुपयांची बिले थकवणा-या सर्वसामान्य लोकांची वीज जोडणी तातडीने कापली जाते पंरतु उक्त शासकीय कार्यालयाची थकबाकी असतांनाही त्यांची वीज तोडण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकरणी शासनामार्फत कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे, शासकीय अस्थापना, पोलीस आयुक्तालय, न्यायालये, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडील थकबाकी अंदाजे रु.५५ कोटी इतकी आहे.

(२) व (३) उक्त थकबाकीदार वीजग्राहक हे अत्यावश्यक सेवा प्रवर्गात येत असल्यामुळे तसेच सरकारी, निम्न सरकारी आस्थापना यांच्या कार्यालयाच्या कामाचे स्वरुप व महत्त्व लक्षात घेता कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून त्यांचा विद्युत पुरवठा खंडीत करणे शक्य नसते. तथापि, वीज देयकाच्या थकबाकी वसुलीसाठी या आस्थापनाच्या वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांबरोबर पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वीजगळती रोखणे आणि वीज बिले वसूल करण्यासाठी निवडण्यात ओलेल्या एनएसडीएल, टोरंटा पॉवर व जीटीएल या खाजगी कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(७५) * १७२२५ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत**

**गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विज वितरण, वीजगळती रोखणे आणि वीज बिले वसूल करण्याबाबत नागपूरसाठी एनएसडीएल, भिवंडीसाठी टोरंटा पॉवर तर औरंगाबादसाठी जीटीएल या खाजगी कंपन्यांची नियुक्त केली होती मात्र या कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील जीटीएल रु.११० कोटी, एनएसजीएल रु.२५० कोटी इत्यादी अशा अनेक कंपन्यांनी वसूल केलेली रक्कम शासनाकडे जमा केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज फ्रॅन्चायझी कंपन्यानी केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराच्या चौकशी बाबत सत्यशोधन समितीची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समितीने शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार शासनाने सदर कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) सत्यशोधक समितीच्या चौकशीचे काम चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) व दौंड (जि.पुणे) तालुक्यात विविध ठिकाणी बेसुमार वाळू उपसा सुरु असल्याबाबत**

**(७६) * १८८८० श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर नंबर १ (ता.श्रीगोंदा जि.अहमदनगर) येथील नदीपात्रात तसेच तालुक्याच्या इतर ठिकाणी बेकायदेशीरपणे वाळू उपसा सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ता.दौंड, (जि.पुणे) येथे विविध ठिकाणी बेसुमार वाळू उपसा सुरु असून वाळू माफियांवर कारवाई करण्याची अनेक निवेदने तहसीलदार यांचेकडे माहे मे, २०१५ ते जून, २०१५ या दरम्यान प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे काय,

(३) तसेच पुणे जिल्हयामध्ये सुरु असलेल्या अनधिकृत वाळू उपशावर आळा घालण्यासाठी तालुका निहाय पथक नेमावे, त्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद करावी, असा प्रस्ताव जिल्हा प्रशासानाने दोन वर्षापूर्वी पाठवून देखील अद्याप या प्रस्तावावर कोणत्याही प्रकारचा निर्णय न झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच प्रश्न भाग (४) बाबत त्वरीत निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) श्रीगोंदा तालुक्यात वाळूच्या अवैध वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टीत्पतीस आली आहेत.

(२) यासंदर्भात तहसिलदार दौंड यांचेकडे निवेदने प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे.

(३) पुणे जिल्हा प्रशासनाने असा कोणताही प्रस्ताव शासनास पाठविलेला नाही.

(४) (अ) अहमदनगर तसेच पुणे जिल्हयात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी तालुकास्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत.

(ब) श्रीगोंदा तालुक्यात (जि.अहमदनगर) माहे एप्रिल, २०१५ ते मे, २०१५ या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतुकीच्या १५ प्रकरणात रु.१,९३,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(क) दौंड तालुक्यात (जि.पुणे) एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीच्या १२६ प्रकरणात रु. ३५,५६,२५०/- इतका दंड वसूल केला आहे. तसेच ६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.